१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, गुरुवार २१ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३३४, पाने-८, किंमत : ₹ ६

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 334, Marathi - Daily - Pune, 21 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## रक्त आणि महसूल एकत्र वाहतो आदित्य ठाकरे यांचा टोला



**मुंबई** - पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही. हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उद्गार आहेत. परंतु बीसीसीआयसाठी रक्त आणि महसूल एकत्र वाहू शकतो. त्यामुळे त्यांनी आशिया कपमध्ये भारत व पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामन्याला परवानगी दिली, असा टोला उबाठा आमदार आदित्य ठाकरे यांनी एक्सवरून लगावला. याशिवाय त्यांनी केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांना पत्र लिहून यामध्ये हस्तक्षेप करण्याची मागणी केली.

# मुंबई व उपनगर हळूहळू पूर्वपदावर पाण्याचा निचरा नाही! आज यलो अलर्ट

■ मुंबई

**आठवड्याच्या सुरुवातीलाच चाकरमान्यांचे हाल करणाऱ्या पावसाचा जोर आज काहीसा ओसरला. त्यामुळे दोन दिवस घरातच अडकलेल्या, लोकलमुळे खोळंबा झालेल्या मुंबईकरांना दिलासा मिळाला. पावसाचा जोर कमी झाला असला तरी मुंबई लोकलला आजही विलंबच झाला.**



आज सकाळपासून मुंबईत पाऊस कमी होता. मात्र उपनगरात जोर कायम होता. परिणामी आजही लोकलचे वेळापत्रक कोलमडले. पश्चिम, मध्य आणि हार्बर या सर्वच मार्गावरील लोकल १० ते ४० मिनिटे उशिराने धावत होत्या. दुपारनंतर पावसाची रिपरिप काहीशी थांबली. हवामान विभागाने मुंबई शहर आणि उपनगरांना आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला होता. पण चाकरमानी घराबाहेर पडत असतानाच त्यामध्ये बदल करून हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला. यासोबतच पालघर, ठाणे, पुणे आणि रायगड जिल्ह्यांनाही रेड अलर्ट देण्यात आला होता. आज मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सातारा तसेच नाशिकच्या घाटमाथ्याला यलो, तर पुण्याच्या घाटमाथ्याला ऑरेंज अलर्ट देण्यात आला होता. त्यामुळे चाकरमानी भीतभीतच घराबाहेर पडले, पण आज पावसाने विश्रांती घेतल्याने दिलासा मिळाला.

पश्चिम द्रुतगती मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली. बोरिवलीकडून वांद्रेच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर सांताक्रुज, विलेपार्ले, अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव यादरम्यान ही मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. गोरेगाव ते सांताक्रुझ १५-२० मिनिटांच्या प्रवासासाठी वाहन चालकांना एक ते दीड तास लागला.

पश्चिम रेल्वेच्या अप आणि डाऊन मार्गावर पहाटे ३.४० ते ५.३१ दरम्यानच्या १७ गाड्या रद्द करण्यात आल्या . यामध्ये चर्चगेटकडे जाणाऱ्या सहा तर विरारला जाणाऱ्या चार गाड्या रद्द करण्यात आल्या. विक्रोळीमध्ये सकाळी साडेआठ आधीच्या २४ तासात सर्वाधिक २२९.५ मिमी पावसाची नोंद झाली. सांताक्रुजमध्ये २०९ मिमी, भायखळ्यात १९३.५ मिमी, जुहू १५०.० मिमी, वांद्रे १३७.५ मिमी पान ७ वर

# ठाकरे ब्रँड पहिल्याच निवडणुकीत अपयशी बेस्ट पतपेढीत सर्व उमेदवार पराभूत

**बेस्ट कर्मचारी सहकारी पतपेढीच्या बहुचर्चित निवडणुकीचा आज निकाल लागला. या निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र येऊन बनवलेल्या उत्कर्ष पॅनेलला २१ पैकी एकही जागा जिंकता आली नाही. ठाकरे ब्रँडचा पदार्पणाच्या निवडणुकीतच दारुण पराभव झाला. यामुळे भविष्यात मराठी माणूस ठाकरे बंधूंच्या पाठीशी राहील का,असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे.**

■ मुंबई



**या** पराभवामुळे ठाकरे गटाची गेल्या नऊ वर्षांची पतपेढीतील सत्ता संपली आहे. या निवडणुकीत शशांक राव यांच्या पॅनेलने १४ जागांवर विजय मिळवत सत्ता काबीज केली तर महायुतीच्या नेत्यांनी प्रसाद लाड यांच्या नेतृत्वाखाली एकत्र येत निवडणुकीत उतरवलेल्या सहकार समृद्धी पॅनेलला ७ जागा मिळाल्या.

बेस्ट पतपेढीची ही पंचवार्षिक निवडणूक आगामी मुंबई महापालिका निवडणुकीची चाचणी समजली जात होती. दोन्ही ठाकरेंनी एकत्र येऊन ठाकरे ब्रँडच्या नावाखाली निवडणूक लढवण्याची ही पहिलीच वेळ होती. दुसऱ्या बाजूला उबाठाची या पतपेढीतील सत्ता उलथवून लावण्यासाठी भाजपा आमदार प्रसाद लाड यांनी पूर्ण ताकद पणाला लावली होती. त्यांनी भाजपाप्रणित श्रमिक उत्कर्ष सभा, नितेश राणे यांची समर्थ बेस्ट कामगार संघटना आणि शिंदेंच्या शिवसेनेचे किरण पावसकर यांची राष्ट्रीय कर्मचारी सेना यांच्यासह पाच संघटनांचा समावेश असलेले सहकार समृद्धी पॅनल रिंगणात उतरवले होते. भाजपाचेच कामगार नेते शशांक राव यांची बेस्ट वर्कर्स युनियन आणि भाजपाचेच दुसरे कामगार नेते सुनील गणाचार्य यांचीही संघटना निवडणुकीत उतरली होती. त्यामुळे भाजपा प्रणित तीन पॅनल या निवडणुकीत ठाकरे बंधूंना टक्कर देण्यासाठी उतरली होती. ठाकरे आणि भाजपा या दोन्ही बाजूंनी ही निवडणूक केली होती.

या विजयानंतर भाजपा आमदार प्रसाद लाड म्हणाले की, बेस्ट निवडणुकीत ठाकरे ब्रँडचे २१ उमेदवार उभे राहिले. मात्र, निकाल ०-२१ लागला. म्हणजेच ठाकरे ब्रँडचे बॉस एकाही जागेवर विजय मिळवू शकले नाहीत. गेली बारा वर्षे त्यांनी मनमानी कारभार केला. भ्रष्टाचार केला. त्याला मी वाचा फोडली. ठाकरे सेनेला वाटले की, दोन भाऊ एकत्र आले म्हणजे मराठी माणूस त्यांच्यामागे नाचायलाच लागेल. आम्ही त्यांना त्यांची जागा दाखवली. पक्षीय पाठिंबा न घेता लढून आम्ही ७ जागा जिंकल्या. काही जागा क्षुल्लक फरकाने गेल्या, तर ८ जागा ३० ते ४० मतांच्या फरकाने हातातून निसटल्या. जवळपास २१५८ मतपत्रिका अवैध ठरविण्यात पान ७ वर

# अहमदाबाद पालिका निवडणूक नरेंद्र मोदी प्रचारात उतरणार

■ अहमदाबाद

गुजरातच्या अहमदाबाद महानगर पालिकेची निवडणूक येत्या काही दिवसांत होणार असून या निवडणुकीच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर येत आहेत. येत्या २५ ऑगस्ट रोजी अहमदाबाद मध्ये त्यांची मिरवणूक व जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

अहमदाबाद महानगर पालिका निवडणूक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाची व प्रतिष्ठेची असून या प्रचारात ते प्रत्यक्ष सहभागी होत आहेत. मोदी यांची ही सभा याआधी



निकोल डीमार्टच्या समोर असलेल्या मैदानात आयोजित करण्यात आली होती. मात्र या ठिकाणी मोठ्या प्रमाणात चिखल साचल्यामुळे या सभेचे स्थान बदलण्यात आले आहे. आता ही सभा रिंग रोड जवळच्या खोडालधाम मैदानावर आयोजित करण्यात आली आहे. त्यांच्या सभेमुळे भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारेल, असे स्थानिक भाजपा नेत्यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेच्या तयारीसाठी नरोडा, निकोल, ठक्करबाप्पानगर, वाटवा व बापुनगर येथील आमदारांच्या बैठकांवर बैठका सुरू आहेत. राज्य सरकार व महानगर पालिका या प्रचारसभेसाठी अहोरात्र काम करत असल्याचेही स्थानिक नेत्याने म्हटले आहे.

# उपराष्ट्रपती पदासाठी उमेदवार राधाकृष्णन यांचा अर्ज दाखल

■ नवी दिल्ली

**एनडीएचे** उमेदवार सी.पी. राधाकृष्णन यांनी आज उपराष्ट्रपती पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यापूर्वी त्यांनी संसदेच्या परिसरातील महात्मा गांधींच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण केली. यरवेळी त्यांच्यासोबत २० प्रस्तावक, २० समर्थक आणि सुमारे १६० सदस्य उपस्थित होते.

विद्यमान उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी अचानक राजीनामा दिल्यामुळे ही निवडणूक घेण्यात येत आहे. उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक ९ सप्टेंबर रोजी होणार असून त्याचदिवशी मतमोजणीही पार पडेल. नामांकन दाखल करण्याची अंतिम तारीख २१ ऑगस्ट असून अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख २५ ऑगस्ट आहे.

एनडीएतर्फे सी.पी. राधाकृष्णन हे उमेदवारीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यांचा सामना इंडिया आघाडीचे उमेदवार व सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांच्याशी होणार आहे. रेड्डी उद्या उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

# ऑनलाईन बेटिंगवर बंदी? लोकसभेत विधेयक सादर

**मंजूर न करता समितीकडे**

■ नवी दिल्ली

**ऑनलाईन** बेटिंग बंद करण्याबाबतचे विधेयक आज केंद्र सरकारने लोकसभेत सादर केले. मात्र ते मंजूर न करता समितीकडे पाठवण्यात आले.

या विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाले तर तब्बल दोन लाख नोकऱ्या धोक्यात येतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे. ऑनलाईन गेमिंगच्या नादाला लागून सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती लाखो रुपये गमावत आहेत. कर्जबाजारी होत आहेत, त्याला या विधेयकामुळे आळा बसेल. काल केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली.



रिअल मनी गेमिंग ॲप्सवर आळा घालणाऱ्या या विधेयकाच्या तरतुदी समाजाच्या व्यापक हितासाठी आहेत. हा एक सामाजिक निर्णय असल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले. भारतात गेल्या चार-पाच वर्षांत ऑनलाईन गेमिंग उद्योग झपाट्याने वाढत आहे. २ लाख कोटी रुपये बाजारमूल्य असलेल्या या उद्योगाकडून दरवर्षी ३१ हजार कोटी रुपयांचा महसूल मिळतो. तर २० हजार कोटी करभरणा केला जातो. सध्या या उद्योगाच्या वाढीचा दर जवळपास २० टक्के असून २०२८ पर्यंत तो दुप्पट होणे अपेक्षित आहे. भारतात सध्या ऑनलाईन गेम खेळणाऱ्यांची संख्या ५० कोटींहून अधिक आहे.

# मुस्लीम मुली १५ व्या वर्षी विवाह करू शकतात

■ नवी दिल्ली

**मुस्लीम** वैयक्तिक कायद्यानुसार मुलगी वयात आली की ती लग्न करण्यात पात्र ठरते, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने एका

**सुप्रीम कोर्टाचा निर्वाळा**

याचिकेवर निर्णय देताना दिला.

पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने १५ आणि १६ वर्षे वयाच्या दोन मुस्लीम विवाहित मुलींच्या आपल्याला संरक्षण देण्याच्या मागणीसाठी केलेल्या याचिकेवर निकाल देताना मुस्लीम वैयक्तिक कायद्याच्या आधारे या दोन्ही मुलींचा विवाह वैध ठरवला होता. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. न्या. बी. व्ही. नागरत्न आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. त्याप्रसंगी न्यायालयाने आयोगाला या प्रकरणी याचिका करण्याचा कसलाही अधिकार नाही, असे सांगत याचिका फेटाळली. तसेच पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने दिलेला निकाल कायम ठेवला.

# तिरुपतीच्या बालाजी मंदिरात तब्बल १४० कोटींचे सोने दान

■ अमरावती

**देशातील** श्रीमंत देवस्थानांपैकी एक असलेल्या तिरुपतीमधील श्री बालाजी मंदिरात भाविक दररोज लाखो रुपयांचे दान अर्पण करतात. आता तर एका भाविकाने या मंदिरात तब्बल १४० कोटी रुपयांचे १२१ किलो सोने दान करण्याचा निर्णय घेतला आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी ही माहिती दिली.या भक्ताचे नाव गुप्त ठेवण्यात आले आहे.



मंगलागिरी येथील गरिबी निर्मूलन कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री नायडू म्हणाले की, या भाविकाने स्वतःची कंपनी सुरू करण्याचे स्वप्न पाहिले होते. भगवान वेंकटेश्वर स्वामींच्या कृपेने फक्त कंपनीच स्थापन झाली नाही, तर त्यांना मोठे यशही मिळाले. या भाविकाने आपल्या यशाचे श्रेय देवाला देण्याचे ठरवले. म्हणूनच आता ते १२१ किलो सोने वेंकटेश्वर स्वामींना अर्पण करत आहेत. या भक्ताने आपल्या कंपनीचे ६० टक्के शेअर विकून १.५ अब्ज अमेरिकन डॉलर कमावले आहेत. त्यामुळेच आता आपल्या संपत्तीचा काही भाग देवाला समर्पित करण्याची त्यांची इच्छा आहे. भगवान वेंकटेश्वर स्वामींची मूर्ती दररोज सुमारे १२० किलो सोन्याच्या दागिन्यांनी सजवली जाते. जेव्हा या भक्ताला हे कळले तेव्हा त्यांनी १२१ किलो सोने दान करण्याचा निर्णय घेतला.

# मंत्री, मुख्यमंत्री,पंतप्रधान संकटात ३० दिवस कोठडी तर हकालपट्टी

■ नवी दिल्ली

**राजकारणातील** वाढती गुन्हेगारी रोखण्याचा उद्देश असल्याचे सांगत केंद्र सरकारने आज संसदेत एक महत्त्वाचे विधेयक सादर केले. भ्रष्टाचार किंवा अन्य गंभीर गुन्हयात अडकलेला मंत्रीत्त, मुख्यमंत्री आणि पंतप्रधान हे ३० दिवस कोठडीत गेले तर त्यांची पदावरून तात्काळ हकालपट्टी होणार आहे. या विधेयकाला जोरदार विरोध झाल्यानंतर ते अवलोकनासाठी समितीकडे पाठवण्यात आले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी १३० व्या घटनादुरुस्तीच्या माध्यमातून हे विधेयक आज लोकसभेत सादर केले.त्यावेळी विधेयकाच्या विरोधात

**लोकसभेत विधेयक सादर**

विरोधी पक्षांच्या खासदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. काही खासदार अध्यक्षांसमोरील मोकळ्या जागेत उतरून घोषणा देऊ लागले. काहींनी विधेयकाच्या प्रति फाडून अमित शहा यांच्या अंगावर फेकले. या गदारोळातच शहा यांनी विधेयक मांडले.


मात्र विरोधी पक्षांचा आक्रमक पवित्रा पाहून या विधेयकावर घाईघाईने मतदान न घेता ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठविले जाईल,अशी घोषणा शहा यांनी केली. काँग्रेसच्या खासदार प्रियंका गांधी यांनी या विधेयकाला विरोध करताना फार जळजळीत प्रतिक्रिया दिली.

# खराब रस्त्यावरील टोलवसुली सर्वोच्च न्यायालयाने स्थगित केली

■ नवी दिल्ली

**टोल** वसुलीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय देत भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची कानउघाडणी केली. रस्त्याची दुरवस्था असल्याने न्यायालयाने टोलवसुली करण्यास स्थगिती दिली. सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या. विनोद चंद्रन यांच्या पीठाने हा निर्णय दिला.

केरळातील ५४४ क्रमांकाच्या एडापल्ली-मन्नुथी राष्ट्रीय महामार्गाच्या दुरवस्थेसंदर्भातील सुनावणीवेळी हा निकाल दिला. केरळ हायकोर्टाने या राष्ट्रीय महामार्गावरील त्रिशूर जिल्ह्यातील पलियेक्कारा



टोल नाक्यावर टोलवसुली करण्यास स्थगिती दिली होती. हायकोर्टाच्या या निर्णयाला प्राधिकरण आणि गुरुवायूर इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्यातर्फे सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. यावरील सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाने खराब रस्त्यांवरही टोलवसुली होत असल्याबद्दल खडेबोल सुनावले.

सुनावणीवेळी न्यायालयाने रस्त्याच्या दुरवस्थेवरून प्राधिकरणाची खरडपट्टी करत रस्ता वाहने चालवण्याच्या लायकीचा नसेल तर प्रवाशांकडून टोल कसा वसूल करू शकता, असा सवाल केला होता. एखाद्या व्यक्तीला रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला जाण्यासाठी पान ७ वर

# मुंबई , रायगडचे भूखंड भाड्याने देणार बंदर प्राधिकरणाची १३ हजार कोटी कमाई

■ मुंबई

**मुंबई** शहर आणि रायगड जिल्ह्यातील २८ भूखंड ३० वर्षांसाठी भाडेतत्वावर देऊन मुंबई बंदर प्राधिकरणाला (एमबीपीए) १३ हजार २७९ कोटी रुपयांचा महसूल मिळणार, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

प्राधिकरणाने ई-निविदा प्रसिध्द केली आहे. भाडेकरारावर देण्यात येणाऱ्या प्राधिकरणाच्या मालकीच्या मालमत्तांमध्ये पी डिमेलो रोडवरील परिचय इमारत, बेलार्ड इस्टेट येथील रेल्वे व्यवस्थापकांची इमारत, ससून डॉक येथील गोदामे ,कुलाबामधील एक भूखंड आणि अलिबागच्या थळमधील १९ हजार ३८४ चौरस मीटर हरित पट्ट्यातील भूखंड यांचा समावेश आहे. ससून डॉकमधील आरआर १४५५ या भूखंडाचे भाडे सर्वाधिक म्हणजेच ११०.९६ कोटी रुपये अपेक्षित आहे. अनेक छोट्या मोठ्या गोदामांचे भाडे ४.६७ कोटी ते २९.९१ कोटी रुपये अपेक्षित आहे, असेही या अधिकाऱ्याने सांगितले.

# पर्युषण काळात कत्तलखाने ९ दिवस बंद ठेवण्याची मागणी फेटाळली

■ मुंबई

**मुंबई** उच्च न्यायालयाने जैन धर्मियांच्या पर्युषण पर्वाच्या काळात मुंबईतील कत्तलखाने नऊ दिवस बंद ठेवण्याची मागणी फेटाळली आहे. मात्र या काळात यापूर्वीच्या एका दिवसाऐवजी यावर्षी दोन दिवस कत्तलखाने बंद ठेवण्यात येणार आहेत.

याआधी केवळ महावीर जयंतीला कत्तलखाने बंद ठेवण्यात येत होते. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्या. आलोक अराधे व न्या. संदीप मारणे यांच्या पीठाने महानगरपालिकेला एक दिवस कत्तलखाने बंद ठेवण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार पालिकेने दोन दिवस

**उच्च न्यायालयाचा निर्णय**

कत्तलखाने बंद ठेवण्याचे मान्य केले. जैन धर्मियांच्या संघटनांनी पर्युषण काळात नऊ दिवस कत्तलखाने बंद ठेवण्याची याचिका दाखल केली होती. यावर न्यायालयाने म्हटले की, अशा प्रकारची विनंती मान्य करता येणार नाही. कारण मग सर्वच धर्मियांच्या त्यांच्या सणाच्या वेळेस विशेष मागण्या मान्य कराव्या लागतील. जैन धर्मियांच्या अहिंसा तत्त्वाला या कत्तलखान्यामुळे धोका पोहोचतो असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे होते. यासाठी पर्युषणचे ९ दिवस कत्तलखाने बंद ठेवा, अशी त्यांची मागणी होती. ही मागणी फेटाळत दोन दिवस कत्तलखाने बंद ठेवण्याचा निर्णय कोर्टाने घेतला. परंतु हा निर्णय घातक आहे. पर्युषण काळात एक दिवस कत्तलखाने बंद ठेवले जात होते.

# कर्नाटकमध्ये कठोर कायदा! बालविवाह केल्यास २ वर्षे कैद

■ बंगळुरू




**राज्यात** बालविवाहाच्या घटना वाढत असल्याने कर्नाटक विधानसभेत बालविवाह प्रतिबंधक सुधारणा विधेयक मंजूर करण्यात आले आहे. महिला आणि बालविकास मंत्री लक्ष्मी हेब्बाळकर यांनी हे विधेयक सभागृहात सादर केले.

विधेयक सादर करताना हेब्बाळकर म्हणाल्या की, बालविवाह हा एक सामाजिक कलंक असून कठोर कायदे करूनही तो पूर्णपणे थांबवता आलेला नाही. त्यामुळे या विधेयकात कठोर कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. महिला आणि बालविकास विभागाच्या आकडेवारीनुसार २०२४-२५ मध्ये बालविवाहाची १८२८ प्रकरणे आढळली. यापैकी १२६०प्रकरणे रोखण्यात आली, तर ३६९ प्रकरणे प्रत्यक्ष घडली असून त्यात एफआयआर नोंदवण्यात आले आहेत. नवीन कायद्यानुसार विवाह झाल्यानंतरही संबंधितांवर कारवाई होईल. बालविवाह आढळल्यास दोषींना दोन वर्षांचा तुरुंगवास आणि एक लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा ठोठावली जाईल. राज्यात बालविवाहाचे समूळ उच्चाटन करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे.

देश विदेश

# नायजेरियात मशिदीवरील हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू

■ अबुजा

**नायजेरियाच्या** कटसिना राज्यातील उंगुवान मंताऊ भागात काल एका मशिदीत झालेल्या हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू झाला. शेतकरी व गुराखी यांच्यातील संघर्षातून हा हल्ला झाल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. या भागात मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला असून अनेक ठिकाणी सुरक्षा कडक करण्यात आली आहे. काल सकाळी एका अज्ञात बंदुकधारीने अंदाधुंद गोळ्या चालवल्या. यावेळी मशिदीत सकाळचा नमाज सुरू होता. अद्याप कोणत्याही संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी घेतलेली नाही. गेल्या अनेक वर्षांपासून नायजेरियात शेतकरी व गुराखी यांच्यात जमीन व पाणीवाटपावरुन संघर्ष सुरू आहे. या हल्ल्यानंतर अनेक ठिकाणी लष्कर तैनात करण्यात आले आहे. नायजेरियाच्या आग्नेय भागात गेल्या काही काळापासून हा संघर्ष सुरू असून गेल्या महिन्यातही विविध घटनांमध्ये एकूण दीडशे लोकांचा बळी गेला आहे.

# कॅनडा एअरलाईन्सच्या कर्मचाऱ्यांचा संप मागे

■ टोरांटो

**आपल्या** पगारवाढ व इतर मागण्यांसाठी कॅनडा एअरलाईन्सच्या कर्मचाऱ्यांनी सुरू केलेला संप अखेर काल मागे घेण्यात आला. त्यानंतर आजपासून या कंपनीच्या विमानांचे उड्डाण सुरू झाले. यामुळे गेल्या शनिवारपासून जागोजागी अडकलेल्या प्रवाशांना दिलासा मिळाला आहे. कॅनडा एअरलाईन्सच्या तब्बल १० हजार कर्मचाऱ्यांनी हा संप पुकारला होता. त्यानंतर व्यवस्थापनाबरोबर झालेल्या चर्चेनंतर त्यांनी संप मागे घेतला. त्यांना किती पगारवाढ मिळाली किंवा व्यवस्थापनाबरोबरच्या वाटाघाटीत काय ठरले याचा तपशील देण्यात आलेला नाही.

# म्हापसा बाजारपेठ रस्त्यावर विजेचा धक्का लागतो

■ म्हापसा

**उत्तर गोवा** जिल्ह्यातील बार्देश तालुक्यात असलेल्या म्हापसा बाजारपेठेत एक खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. या बाजारपेठेत भूमिगत वीजवाहिनी तुटल्याने शकुंतलेच्या पुतळ्याजवळील रस्त्यावरच विजेचा प्रवाह जाणवत होता. एका व्यक्तीस धक्का लागल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. म्हापसा वीज कर्मचाऱ्यांनी बाजारातील वीजपुरवठा तत्काळ खंडित केला आहे.

म्हापसा बाजारपेठेतील रस्त्यावर करंट येण्याचा हा प्रकार पथदीप किंवा वीज वाहिन्यातील गळतीमुळे घडला असावा,असा अंदाज आहे.त्यामुळे तत्काळ वीज पुरवठा खंडित करण्यात आला. याबाबत वीज कर्मचाऱ्यांमार्फत योग्य तपासणी केली जाईल, असे कार्यकारी वीज अभियंता सुभाष पार्सेकर यांनी सांगितले.

# शारदा चिटफंड प्रकरणातील २ आरोपी तीन खटल्यांत निर्दोष

■ कोलकाता

**बहुचर्चित** कोट्यवधींच्या शारदा चिटफंड घोटाळ्यातील आरोपी सुदीप्त सेन आणि सहआरोपी देबजानी मुखर्जी यांना न्यायालयाने अनेक प्रकरणांपैकी तीन प्रकरणांमध्ये निर्दोष ठरवले. त्यांच्यावर विश्वासघात आणि फसवणुकीचा आरोप होता.

शारदा ग्रुपचे अध्यक्ष सेन आणि त्यांची जवळची सहकारी देबजानी यांना या तिन्ही प्रकरणांमध्ये जामीन मिळाला होता. २०१६-१७ मध्ये सुरू झालेल्या या प्रकरणांच्या सुनावणीत ५२ हून अधिक साक्षीदार न्यायालयात हजर झाले. आरोपींचे वकील न्यायालयात म्हणाले, की सरकारी पक्ष कोणतेही आरोप सिद्ध करू शकला नाही. त्यामुळे न्यायालयाने दोघांनाही निर्दोष ठरवले. या सुनावणीला वेळ लागला, कारण न्यायालयाने साक्षीदारांना अनेकवेळा संधी दिली.

# स्वीडनच्या किरुनामधील चर्च पाच किमी हलवले

■ स्टॉकहोम



**जगात** विविध वस्तू व सामानसुमानाचे दळणवळण सुरू असते. परदेशात अनेक घरेही एकीकडून दुसरीकडे हलवली जातात. अशाच पद्धतीने स्वीडनमध्ये चक्क एक चर्चच ५ किलोमीटर दूर नेण्यात आले. भूस्खलनाचा धोका वाढल्याने हे चर्च अवजड यंत्रांच्या सहाय्याने चाकावर दुसरीकडे नेण्यात आले.

स्वीडनमधील किरुना शहरातील हे चर्च ११३ वर्ष जुने होते. उंची दर्जाच्या लाकडापासून तयार करण्यात आलेल्या या चर्चची स्थापना १९१२ साली करण्यात आली. किरुना भागात लोखंड खनिजांच्या खाणीमुळे जमीन भुसभुशीत झाली होती. त्यामुळे हे चर्च हलवण्याचा निर्णय घेण्यात आला. हे चर्च शहराच्या उत्तरेकडील जागेत नेण्यात आले. या पाच किलोमीटरच्या प्रवासासाठी दोन दिवस लागले असून हे चर्च ताशी ५०० मीटर वेगाने हलवण्यात आले. वाटेत एका रात्रीचा मुक्कामही करण्यात आला. चर्च हलवण्याची सुरुवात ख्रिस्ती धर्मगुरुंनी केलेल्या धार्मिक विधींनी झाली. चर्चचे हे स्थलांतर पाहण्यासाठी रस्त्यावर मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते. २०१० सालापासूनच किरुना भागातील इतर इमारती रिकाम्या करण्यात आल्या होत्या.

# मुंबईतील मराठा मोर्चासाठी कडेगावात गावोगावी बैठका

■ सांगली

**मराठा** आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणासाठी मुंबई गाठण्याचा इशारा दिला आहे.२९ ऑगस्ट रोजी मुंबईमध्ये मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणासाठी आमरण उपोषण करणार आहेत. त्यांना पाठिंबा म्हणून जिल्ह्यातील कडेगाव तालुक्यातील गावागावात बैठका जोरात सुरू आहेत. त्यामध्ये मराठा समाज एकत्र येताना दिसत आहे. मुंबईतील मराठा मोर्चाची तयारी म्हणून २२ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता शिवणी फाटा ते कडेगाव या प्रमुख मार्गावर भव्य दुचाकी रॅली काढली जाणार आहे. या रॅलीमध्ये सहभागी होण्यासाठी सर्व मराठा समाजबांधव सकाळी ११ वाजता आपाआपल्या गावातून रॅलीने निघणार आहेत व शिवणी फाटा येथे दुपारी १ पर्यंत एकत्र येणार आहेत.याआधी झालेल्या कडेगाव व देवराष्ट्रे येथील बैठकांना मराठा बांधवांचा प्रतिसाद लाभला. जरांगे पाटील यांच्या उपोषण आंदोलनाला आमचा पूर्ण पाठिंबा आहे.

# वाहन घसरले तरी तो अपघातच हायकोर्टाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

**महिलेच्या कुटुंबियांना ८ लाख भरपाई मंजूर**

■ मुंबई



**दुसऱ्या** वाहनाची धडक लागल्यावरच तो अपघात ठरत नाही, तर एखादे वाहन घसरले तरी तो अपघातच असतो. त्यामुळे अशा अपघातातील पीडितही मोटार वाहन कायद्यांतर्गत नुकसानभरपाईस पात्र आहेत, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवित उच्च न्यायालयाने मृत महिलेच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई देण्याचे आदेश विमा कंपनीला दिले.

मोटार वाहन कायद्यात अपघाताची व्याख्या परिभाषित केलेली नाही. व्यक्तीला अचानक इजा पोहोचवणारी घटना असा उल्लेख करण्यात आला आहे, असे म्हणत न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांच्या एकलपीठाने एका महिलेच्या नातेवाईकांना ७ लाख ८२ हजार ८०० रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश विमा कंपनीला दिले.संबंधित महिलेची साडी मोटारसायकलच्या चाकात अडकल्याने मोटारसायकल रस्त्यावर घसरली होती आणि त्या अपघातात तिचा मृत्यू झाला होता.त्यानंतर महिलेच्या पतीने नुकसानभरपाईसाठी मोटार वाहन अपघात लवादात अर्ज केला होता.

# कुर्ल्यातील हॉटेल जळीतकांड एचपीसीएलने भरपाई नाकारली

■ मुंबई

**मुंबईत** कुर्ला इथे दहा वर्षांपूर्वी एका हॉटेलला लागलेल्या आगीत ८ जणांचा मृत्यू झाला होता. यातील पीडितांना नुकसानभरपाई देण्यात टाळाटाळ होत असून एचपीसीएल गॅस कंपनीने यात आपला दोष नसल्याचे म्हणत नुकसान भरपाई देण्याची मागणी फेटाळली आहे. मुंबई महानगर पालिकेने पीडितांच्या कुटुंबाला पन्नास लाख रुपये नुकसान भरपाई द्यावी, असा निर्णय न्यायालयाने दिला. त्यासाठी दिलेली मुदत पुढच्या महिन्याच्या सुरुवातीला संपत आहे . मात्र अद्याप एकाही पीडिताच्या कुटुंबाला मदत देण्यात आलेली नाही.

वॉचडॉग फाऊंडेशन ही स्वयंसेवी संघटना या पीडितांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्यांच्या भरपाईच्या मागणीला एचपीसीएलने वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत. एचपीसीएलने म्हटले की, आगीची दुर्घटना गॅस सिलिंडरच्या गळतीमुळे झाल्याचा कोणताही पुरावा नाही. या हॉटेलमधील दोन गॅस सिलिंडर व्यवस्थित आढळले होते.

# संजय गांधी राष्ट्रीय उद्यान रहिवाशांचा शनिवारी मेळावा

■ मुंबई

**बोरिवली** येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीतील झोपडीवासीयांचे पुनर्वसन मरोळ-मरोशी येथील ठरलेल्या जागेवरच करावे, या मागणीसाठी २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता केशव गोरे स्मारक ट्रस्टच्या सभागृहात या रहिवाशांचा मेळावा होणार आहे. जनता दल (सेक्युलर) मुंबई आणि बेघर झोपडपट्टी गोरगरीब रहिवासी संघटना यांच्यातर्फे हा मेळावा आयोजित केला आहे. या हद्दीतील १८ हजार झोपडीवासीयांचे मरोळ-मरोशी येथे पुनर्वसन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मात्र काही राजकीय मंडळींनी या रहिवाशांचे मूळ जागेजवळच पुनर्वसन झाले पाहिजे, अशी भूमिका घेतल्याने हा प्रकल्प बारगळला आहे. पुनर्वसनासाठी आता नव्या जागेचा शोध सुरू केला आहे.मात्र या रहिवाशांचे मरोळमध्येच पुनर्वसन करा अशी भूमिका जनता दल सेक्युलर मुंबई पक्षाने घेतली आहे.

# चित्रपटाच्या शीर्षकाला कॉपीराइट लागू होत नाही

**मुंबई हायकोर्टाचा निकाल**

■ मुंबई

**चित्रपटाच्या** शीर्षकाला कॉपीराइट लागू होत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. १९९३ मधील बॉलिवूड चित्रपट लुटेरेच्या निर्मात्याने त्याच शीर्षकाने वेबसीरिज प्रदर्शित होऊ नये, अशी मागणी करत दाखल केलेली याचिका न्यायालयाने फेटाळून लावली.

न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या एकल खंडपीठाने स्पष्ट केले की, चित्रपटाच्या शीर्षकाची नोंदणी निर्माता संघटनांकडे करणे ही फक्त खासगी स्वरुपाची व्यवस्था आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा वैधानिक किंवा कॉपीराइटसारखा कायदेशीर अधिकार निर्माण होत नाही. अशा नोंदणीचा लाभ केवळ संघटनेतील सदस्यांनाच लागू होतो. केवळ शीर्षक एकसारखे आहे म्हणून कॉपीराइट उल्लंघनाचा दावा करता येत नाही. कथा वेगळी असेल, तर शीर्षकावर दावा करण्याचा कायदेशीर अधिकार मिळत नाही. लुटेरे चित्रपटाचे निर्माता सुनील सबरवाल यांनी गेल्या वर्षी ही याचिका दाखल केली होती. त्यांचा दावा होता की, डिजनी प्लस हॉटस्टारवरील आठ भागांची लुटेरे वेब सीरिज त्यांच्या चित्रपटाच्या कॉपीराइटचे उल्लंघन करते.

# चिपी विमानतळ लवकरच पुन्हा सुरू! सरकारची मंजुरी

■ मुंबई



**गेल्या** काही महिन्यांपासून तांत्रिक अडचणींमुळे बंद पडलेले कोकणातील चिपी विमानतळ आता लवकरच पुन्हा सुरू होणार आहे. कारण या विमानतळावरून पुन्हा विमानसेवा सुरू करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. विशेष म्हणजे गणेशोत्सवापूर्वी चिपी विमानतळ सुरू करण्याचे सरकारचे प्रयत्न आहेत. हे विमानतळ पुन्हा सुरू करण्यासाठी खासदार नारायण राणे यांनी सातत्याने केंद्राकडे पाठपुरावा केला होता.

सिंधुदुर्गातील चिपी विमानतळ ऑक्टोबर २०२१ मध्ये प्रवासी सेवेसाठी सुरू झाले होते.या विमानतळाचा खर्च राज्य आणि केंद्र सरकारने उचलला होता. या विमानसेवेची सुरुवात चांगली झाली होती.मात्र,नंतर काही दिवसांतच ही विमानसेवा बंद करावी लागली होती.आता मंत्रिमंडळ बैठकीत पुन्हा चिपी विमानतळ सुरू करून विमानसेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी खासदार नारायण राणे यांनी केंद्राकडे पाठपुरावा करून हे विमानतळ व्हायबलिटी गॅप फंडिंग अंतर्गत सुरू करण्यासाठी केंद्राची परवानगी घेतली. यानुसार मंत्रिमंडळ बैठकीत चिपी विमानतळाची सेवा पूर्ववत करण्यास सकारात्मक निर्णय घेण्यात आला,अशी माहिती मंत्री नितेश राणे यांनी दिली.

# शंभूराज देसाई यांच्या हस्ते कोयना धरणात जलपूजन

■ सातारा



**कोयना** धरणात ९६.३८ टक्के टी.एम.सी. पाणीसाठा झाला आहे. या धरणातील जलाशयातील जलपूजन पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले. कोयना धरणस्थळी झालेल्या जलपुजन कार्यक्रमास जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता अभय काटकर, प्रांताधिकारी सोपान टोम्पे, तहसीलदार अनंत गुरव, कार्यकारी अभियंता महेश रासनकर आदी उपस्थित होते.

पालकमंत्री देसाई यांनी कोयना धरणातील जलाचे विधिवत पूजन करून ओटी भरण केले. यावेळी ते म्हणाले की, कोयना धरणास महाराष्ट्राची भाग्यरेखा म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राच्या विशेषतः पश्चिम महाराष्ट्राच्या भरभराटीमध्ये, संपन्नतेमध्ये या धरणाचा फार मोलाचा वाटा आहे. आज परंपरेने रितीरिवाजाप्रमाणे प्रशासनास घेऊन जलपूजन करत असताना सध्या धरणात १०१ टीएमसी पाणीसाठा आहे. पाण्याचा ९९,००० क्युसेक्सने विसर्गही सुरू आहे. कोयना धरण हे १०० टीएमसीच्यावर भरल्याने कोयनामाईची अशीच कृपा संपूर्ण महाराष्ट्रावर व्हावी, सुजलाम सुफलाम महाराष्ट्र व्हावा, पाण्याची टंचाई भासू नये, मुबलक वीज निर्मिती व्हावी, यासाठी कोयनामाईचे पूजन करण्यात आल्याची भावनाही पालकमंत्री देसाई यांनी यावेळी व्यक्त केली.

# उंब्रजमध्ये भीम-कुंती उत्सव गुलाल- खोबरे,फळांचा वर्षाव

■ कराड

**शेकडो** वर्षांची परंपरा असलेला उंब्रज येथील भीम-कुंती यात्रा सोहळा रिमझिम पावसात हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा झाला. 'भीमसेन महाराज की जय' आणि 'कुंती माता की जय'च्या जयघोषात गुलाल- खोबरे आणि फळांचा वर्षाव करत ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वारसा जपणारा हा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला.

यंदा कुंती मातेच्या अश्वारूढ रथात विराजमान होण्याचा मान बापूसो शंकर जाधव यांनी १ लाख ११ हजार १११ रुपयांची सर्वाधिक बोली लावून मिळवला. श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी होणारा हा उत्सव बेंद्रापासून सुरू होतो, तिथे माय-लेकांच्या भेटीचा सोहळा मुख्य आकर्षण ठरतो. सकाळपासूनच भीमसेन मंडळ आणि ग्रामस्थांनी तयारीला सुरुवात केली होती. सकाळी ११ वाजता भीम मंडपात कुंती मातेच्या मूर्तीला रथात घेऊन बसण्यासाठी लिलाव बोलीला सुरुवात झाली.

# वरंधा घाटातील महाड हद्दीत दरड कोसळली

■ रायगड

**महाड** पोलादपूर तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आज पहाटे वरंधा घाटात दरड कोसळली.ही दरड भोर-महाड मार्गावर महाड हद्दीत कोसळली असून यामुळे या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. प्रशासनाने तातडीने घटनास्थळी पोहोचून दरड हटवण्याचे काम पूर्ण झाले. पण सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सदर मार्ग प्रवासासाठी तात्पुरता बंद ठेवण्यात आला आहे.

या मार्गावर दरड कोसळण्याचे प्रकार वारंवार घडत असून त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलादपूर तालुक्यातील काही ग्रामीण भागांत घरांच्या व गोठ्यांच्या भिंती कोसळण्याचे प्रकार घडले आहेत. त्यामुळे या भागातील दरडप्रवण गावांमधील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी खबरदारीचा उपाय म्हणून रायगड जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे. स्थानिक प्रशासन सतर्क असून आवश्यक सर्व उपाययोजना केल्या जात आहेत. ग्रामस्थांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

# गगनबावडा मार्ग पावसामुळे बंद उपचाराअभावी बालकाचा मृत्यू

**आपत्कालीन व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह**

■ कोल्हापूर

**कोल्हापूर** जिल्ह्यातील गगनबावडा मार्ग मुसळधार पावसामुळे बंद झाल्याने एका गर्भवती महिलेला वेळेवर उपचार मिळू शकले नाहीत. या विलंबाचा परिणाम नवजात बाळाच्या मृत्यूच्या दुर्दैवी घटनेत झाला.

बोरबेट येथील कल्पना आनंदा डुकरे (३३) या सात महिन्यांच्या गर्भवती महिलेला सकाळी प्रसुतीच्या वेदना सुरू झाल्या. कुटुंबियांनी तातडीने त्यांना गारीवडे येथून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मदतीने गगनबावडा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. पुढील उपचारासाठी त्यांना कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात हलविण्याचा सल्ला देण्यात आला.

पण गगनबावडा मार्गावरील पूरस्थितीमुळे वाहतूक ठप्प असल्याने रुग्णवाहिकेला वाटेतच अडथळे आले. खोकुर्ले येथील पडवळवाडी भागात, रुग्णवाहिकेतच कल्पनाची प्रसुती झाली. प्रसुती सातव्या महिन्यातच झाल्याने बाळाचे वजन कमी होते व शरीराची वाढ पूर्ण झालेली नव्हती. परिणामी, नवजात बाळाचा मृत्यू झाला, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली.

गगनबावडा तालुक्यातील कुंभी नदीच्या पुरामुळे अनेक मार्गांवर पाणी साचले असून, त्यामुळे आरोग्य सेवा व आपत्कालीन वाहतूक यंत्रणा मोठ्या अडचणीत सापडल्या आहेत. या घटनेमुळे प्रशासनाच्या आपत्कालीन व्यवस्थापनावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

# गडचिरोलीत मुख्याध्यापक व तरुण नाल्यात वाहून गेल्याने मृत्यू

■ गडचिरोली

**गडचिरोली** जिल्ह्यात सोमवार १८ ऑगस्ट रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक असंतू सोमा तलांडी (४०) हे सिपनपल्ली नाल्यात आणि लालचंद कपिलसाही लकडा (१९) हा खंडी नाल्यात वाहून गेल्याने दोघांचा मृत्यू झाला.

भामरागड व अहेरी तालुक्यातील अनेक नद्या-नाले दुथडी भरून वाहत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे. मुख्याध्यापक तलांडी पेरमिलीवरून त्यांच्या जोनावाही या गावी जात होते. रस्त्यातील सिपनपल्ली नाल्याला पूर आलेला असतानाही त्यांनी तो ओलांडण्याचा प्रयत्न केला. मात्र पाण्याच्या प्रचंड प्रवाहात ते वाहून गेले. स्थानिक प्रशासनाने राबवलेल्या शोधमोहिमेत नाल्याच्याकडेला त्यांचा मृतदेह आढळला. या घटनेच्या काही तासांपूर्वी भामरागड तालुक्यातील कोडपे गावातील लालचंद या युवकाचाही खंडी नाल्यातील पुरात वाहून जाऊन मृत्यू झाला.

# कापूस आयात शुल्क ३० सप्टेंबरपर्यंत माफ

■ नवी दिल्ली



**कापड** उद्योगाला कच्चा माल किफायतशीर दरात उपलब्ध व्हावा यासाठी केंद्र सरकारने प्रक्रिया न केलेल्या कापसावरील आयात शुल्क ३० सप्टेंबरपर्यंत माफ केले आहे.

कापसाच्या आयातीवर सध्या ११ टक्के आयात शुल्क आणि कृषी पायाभूत सुविधा आणि विकास अधिभार लावला जातो.अर्थ मंत्रालयाने यासंदर्भात १८ ऑगस्ट रोजी अधिसूचना जारी केली आहे. या अधिसूचनेनुसार १९ ऑगस्ट ते ३० सप्टेंबरपर्यंत व्यापाऱ्यांना कापसावरील आयात शुल्क भरावे लागणार नाही.

जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कापडाचे दर स्पर्धात्मक राखणे आवश्यक आहे. देशांतर्गत कापड उद्योग सध्या अडचणीत आहे.त्यातच भारतीय निर्यातीवर अमेरिकेने ५० टक्के आयात शुल्क लागू केले आहे.त्यामुळे कापड निर्यातीला फटका बसला आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# मुंबईत पाऊस आणि अनास्थेचे भय

गेले दोन दिवस मुंबईला केवळ पावसाने वेठीला धरले असे नाही तर मुंबईच्या नियोजनातल्या अनास्थेनेसुद्धा वेठीला धरले आहे. साधारणपणे गेल्या तीस वर्षापासून मुंबईच्या या आक्राळविक्राळ विस्तारावर प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे. विशेषतः २००५ च्या २६ जुलैचा तडाखा हा सगळ्या व्यवस्थांना आणि सरकारी यंत्रणांना खडबडून जागे करणारा होता. परंतु आपल्या देशात एखादी घटना घडल्यानंतर तात्पुरत्या उपाययोजना केल्या जातात. अशा घटना पुढच्या शंभर दोनशे वर्षात घडू नयेत आणि घडल्याच तर अत्यंत परिणामकारक योजना केल्या पाहिजेत. असेदेखील सरकारी यंत्रणांना वाटत नाही. दोनच दिवसांपूर्वी ज्या पद्धतीने पावसाने मुंबईला झोडपून काढले तो प्रकार खूप नवीन होता अशातलाही भाग नाही. महिन्याभराचा पाऊस तीन दिवसात कोसळला. म्हणूनच ही परिस्थिती झाली. असे सांगून पळवाट शोधण्याचा प्रयत्न होतो. २६ जुलैला तर तीस वर्षाचा पाऊस तीन तासांत पडला होता. तो जर पुढे आणखी चार पाच राहिला असता तर मुंबई जलमयच नाही तर निम्मी मुंबई पाण्यात बुडाली असती. लष्कराच्या साहाय्यानेसुद्धा मदतकार्य नीट होऊ शकले नसते. इतकी गंभीर परिस्थिती त्यावेळेला होती. २६ जुलैचा तो थरारक प्रकार घडल्यानंतर मुंबईसाठी काय-काय उपाययोजना केल्या पाहिजेत. यावर बराच काळ चर्चा चालली. आणि अशा परिस्थितीतून मुंबईला वाचवायचे असेल तर काय केले पाहिजे याचादेखील विचार झाला. मुंबई महापालिकेच्या स्तरावर पावसाचे पाणी तुंबू नये. यासाठी सर्व खबरदारीच्या उपाययोजना केल्या जातात. मग अगदी मार्च एप्रिलपासूनच नालासफाईची कामे सुरू होतात आणि प्रत्यक्ष पावसाळ्यात जिथे जिथे पाणी तुंबण्याची शक्यता वाटते तिथे तिथे पाण्याचा उपसा करणारे पंप कार्यरत राहातात. संपूर्ण मुंबई शहर आणि उपनगरामध्ये अशा पंपांना चोवीस तास कार्यरत ठेवले जाते. यावेळीदेखील ठिकठिकाणी हे पंप कार्यरत होते. तरीदेखील जो प्रकार व्हायचा तो झालाच. यावरून उपाययोजनावरही पाणी फिरवण्याचे प्रकार पाऊस करून जातो हे पुन्हा सिद्ध झाले.

**मोनोरेल्वेचा थरारक प्रकार**

यावेळचा आणखी एक थरारक भाग म्हणजे मोनोरेल्वेत अडकलेल्या प्रवाशांची दुर्दशा हा होता. रस्त्यावर पाणीच पाणी असल्याने लोकांनी मोनोरेलचा आश्रय घेतला. आणि आपल्या नित्याच्या सवयीप्रमाणे मोनोरेलचे पाच डबेसुद्धा गर्दीने तुडुंब भरले. स्वाभाविकपणे क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी झाल्याने चेंबूरच्या भक्तीपार्क परिसरात ही मोनोरेल थोडी तिरपी झाली. योग्यवेळी ती थांबवली गेली. अन्यथा यापेक्षाही भयंकर प्रसंग ओढवला असता. गेल्या पंचवीस तीस वर्षात मोनोरेलसंदर्भात कोणत्याही विशेष तक्रारी ऐकायला मिळाल्या नव्हत्या. कारण त्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्याही मर्यादित असते. मात्र क्षमतेपेक्षा थोडे तरी प्रवासी जास्त झाले तरी अडकून पडणारी ही मोनोरेल ना घर का ना घाटका, अशा विचित्र स्थितीत येऊन पोहचते. जो प्रकार मोनोरेल्वेचा झाला. तशाच धोक्यांची शक्यता मेट्रोबाबतही होऊ शकते. यावेळेला पुन्हा बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये पाणी शिरले होते. मुंबईची एकूण लोकसंख्या सव्वा कोटीच्या आसपास आहे आणि रोज मुंबई महानगरात किमान एक कोटी लोक वेगवेगळ्या कामांसाठी बाहेर पडत असतात.या सर्वांसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा आता पुरेशा ठरत नाहीत आणि भविष्यकाळात अशा कितीही सुविधा केल्या तरी त्या पुरेशा ठरतीलच असे सांगता येत नाही. एकीकडे भौगोलिक मर्यादा असलेल्या या महानगरात वाढत्या लोकसंख्येचा भडीमार होत आहे. विशेषतः महाराष्ट्राच्या बाहेरून येणाऱ्यांची संख्या प्रचंड वेगाने वाढते आहे. मुंबईचे क्षेत्रफळ आणि लोकसंख्येची घनता यामध्ये जमीन आसमानाचे अंतर पडत चालले आहे. जोपर्यंत मुंबईच्या लोकसंख्येवर नियंत्रण आणले जात नाही. तोपर्यंत मुंबईच्या जनजीवनामध्ये अमूलाग्र सुधारणा होण्याची शक्यताच नाही. पावसाळा वगळता मुंबईतले वातावरण छानछोकीचे वाटत असले तरी तेदेखील अर्धसत्य आहे. कारण गेल्या पाच वर्षात मुंबईच्या वायूप्रदूषणात दिल्लीप्रमाणेच वाढ झालेली आहे. दमट वातावरण आणि सततच्या गर्दीमुळे संसर्गजन्य रोगांचाही फैलाव होत असतो.अशा समस्यांनीदेखील मुंबईला वेठीला धरले आहे.

**पुढच्या शंभर वर्षाचे नियोजन हवे**

दरवर्षीच्या पावसाळ्यात दोन तीनवेळा तरी संपूर्ण मुंबईची तुंबई होते. लोकांच्या तारांबळीला काही सीमा राहात नाही. हे प्रकार मुंबईच्या जगण्याचा एक भाग होत असले तरीसुद्धा त्याचे केव्हा मोठ्या धोक्यात रुपांतर होईल हे सांगता येत नाही. म्हणून आम्ही यावेळच्या पावसाचे हे धुमशान म्हणजे भविष्यातील धोक्याचा इशारा असल्याचे म्हटले होते. याचीच प्रचिती मुंबई मोनोरेलच्या प्रकारातून आली. तीन दिवसांमध्ये महिनाभराचा पाऊस तीन दिवसांत मुंबईतच का पडावा. यामागेदेखील भौगोलिक किंवा पर्यावरणीय कारणे आहेत. मग अगदी समुद्राची पातळी हळुहळू वाढण्यापासून ते मुंबईतल्या लोकसंख्येला अपुऱ्या पडणाऱ्या नागरी सुविधांपर्यंत त्याची गंभीरता समोर येते. आक्राळविक्राळ स्वरूपात मुंबई शहर आणि उपनगरात लोकसंख्या वाढते आहे. वीस वर्षापूर्वी मुंबईतल्या तळमजल्यांमध्ये पाणी शिरण्याचा धोका नव्हता. पण २००५ पासून त्याची सुरूवात झाली आणि मुंबईत कोणत्याही नव्या इमारतींमध्ये तळमजलाच बांधणे शक्य राहिलेले नाही. यावरून मुंबईच्या भौगोलिक रचनेतला बदलही लक्षात येतो. प्रचंड प्रमाणात होत असलेली बांधकामे त्या टोलेजंग इमारतींमुळे पर्यावरणावर होत असलेला परिणाम दुर्लक्षित करता येत नाही. म्हणूनच मुंबईच्या एकूणच राहाणीमान आणि जीवनमानाविषयी सतत अभ्यास करणारा गट कार्यरत ठेवावा लागेल. पुढच्या किमान शंभर दोनशे वर्षात मुंबईला अशा प्रकारच्या धोक्यांपासून कसे वाचवता येईल, याची उपाययोजना गरजेची ठरते परंतु याबाबत सरकारी पातळीवर कमालीची उदासिनता आणि अनास्था आहे.

**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**अंतर शब्दांमध्ये असेल तर काही फरक पडत नाही, पण जर शब्दांमुळे नात्यांमध्ये अंतर पडत असेल, तर मात्र खुप मोठा फरक पडतो.**

**पंचांग**

**गुरुवार, २१ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

**श्रावण कृष्ण त्रयोदशी**

**नक्षत्र : पुष्प**

**रवी उदय- ०६-२३**
**रवी अस्त- १९-०१**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कर्क**

**शिवरात्री; पर्युषण पर्वारंभ (पंचमी पक्ष); गुरुपुष्यामृत सूर्योदय ते रात्री १२.०८; बृहस्पती पूजन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



# मावा मिश्री लाडू



★ **साहित्य -** मावा - १.५ कप (३०० ग्रॅम), पनीर कप (१५० ग्रॅम), खडीसाखर - १५० ग्रॅम, वेलचीपूड, पिस्त्याचे तुकडे - १ चमचा

★ **कृती -** एका पॅनमध्ये मावा घाला आणि तो चांगला परतून घ्या. मावा हाताने थोडा मॅश करा आणि पॅनमध्ये ठेवा आणि आच मध्यम ठेवा. मावा सतत ढवळत राहा आणि त्याचा रंग बदलेपर्यंत आणि तूप सुटेपर्यंत तळा. मावा तूप सुटेपर्यंत, त्यात किसलेले पनीर घाला आणि मिक्स करताना चांगले परतून घ्या. आता ते कोरडे होईपर्यंत परता, नंतर आच बंद करा आणि गरम पॅनमध्ये थोडे हलवा आणि एका भांड्यात काढा आणि थंड होऊ द्या. मावा पनीर थंड होईपर्यंत, १५० ग्रॅम खडीसाखर मिक्सरमध्ये फिरवून जरा बारीक करा. नंतर ते चाळणीतून गाळून घ्या, आता उरलेली खडबडीत पावडर पुन्हा बारीक करा आणि जाळून घ्या. सर्व साखरेची कँडी त्याचप्रकारे बारीक करा. मावा थंड झाल्यावर त्यात खडीसाखर मिसळा. अर्धा लहान चमचा वेलचीपूड घालून मिश्रण हाताने चांगले मिसळा. मिक्स केल्यानंतर थोडे हातात घ्या आणि लाडू बनवा. सर्व लाडू त्याचप्रकारे बनवा आणि पिस्त्याने सजवा. मावा मिश्री लाडू तयार होतील.



# आशिया हॉकी कपसाठी भारतीय संघ जाहीर

## हरमनप्रीत सिंगकडे कर्णधारपद सोपवले

**बिहारच्या राजगीरमध्ये २९ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या आशिया हॉकी कपसाठी हॉकी इंडियाने भारतीय संघाची घोषणा करण्यात आली.पॅरिस ऑलिंपिकमध्ये भारतासाठी कांस्यपदक जिंकणाऱ्या हरमनप्रीत सिंगकडे संघाची कमान सोपवण्यात आली. कृष्ण बहादूर पाठक आणि सूरज केरकेट्टा यांच्याकडे गोलकिपरची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.**



■ नवी दिल्ली

**सुमित**, जरमनप्रीत सिंग, अमित रोहिदास आणि जुगराज सिंग यांना डिफेन्स लाइनमध्ये स्थान देण्यात आले आहे, तर मनदीप सिंग,शैलेंद्र लाक्रा, अभिषेक आणि दिलप्रीतसारखी नावे फॉरवर्ड लाइनमध्ये आहेत. मनप्रीत सिंग आणि विवेक सागर प्रसाद यांना मिडफिल्डर्समध्ये स्थान देण्यात आले. भारताचा पहिला सामना चीनविरुद्ध भारतीय संघाचा पहिला सामना चीनविरुद्ध असेल. हा सामना २९ ऑगस्ट रोजी खेळला जाईल. त्यानंतर भारतीय संघ जपान आणि कझाकस्तानविरुद्ध साखळी सामने खेळेल. त्यानंतर सुपर-४ फेरीचे सामने खेळवले जातील. पाकिस्तान-ओमानने माघार घेतल्याने बांगलादेश-कझाकस्तानला संधी एक दिवस आधी बिहारमधील राजगीर येथे होणाऱ्या या स्पर्धेतून पाकिस्तान आणि ओमानने आपले नाव मागे घेतले होते.अशा परिस्थितीत बांगलादेश आणि कझाकस्तानला संधी देण्यात आली आहे.कझाकस्तान संघ चीन आणि जपानसह गट 'अ'मध्ये आहे. आशिया कपमधून माघार घेतल्याने पाकिस्तानने विश्वचषकासाठी पात्रता मिळवण्याची संधी गमावली आहे. आशिया कप जिंकणाऱ्या संघाला विश्वचषकाचे तिकीट मिळते. पुढील हॉकी विश्वचषक २०२६ मध्ये बेल्जियम आणि नेदरलँड्समध्ये खेळला जाईल.

**भारतीय हॉकी संघ**

**गोलरक्षक: कृष्ण बहादूर पाठक, सूरज केरकेट्टा. बचावपटू:सुमित, जरमनप्रीत सिंग, संजय, हरमनप्रीत सिंग (कर्णधार), अमित रोहिदास, जुगराज सिंग. मिडफिल्डर: राजिंदर सिंग, राजकुमार पाल, हार्दिक सिंग, मनप्रीत सिंग, विवेक सागर प्रसाद. फॉरवर्ड: मनदीप सिंग, शैलेंद्र लाक्रा, अभिषेक, सुखजीत सिंग,दिलप्रीत सिंग. पर्यायी पर्याय: नीलम संजीप, सेल्वम कार्ती.**

# काकासाहेब विद्यालयाच्या मुलांची चमकदार कामगिरी

■ मुंबई

**तालुकास्तरीय** शालेय बॅडमिंटन स्पर्धांचे आयोजन के. आर. कोतकर ज्युनिअर कॉलेजच्या इंडोर हॉलमध्ये घेण्यात आले. या स्पर्धेत आपल्या चाळीसगावातील डॉ.काकासाहेब पूर्णपात्रे माध्यमिक विद्यालयाच्या १४ वर्षांतील आणि १७ वर्षांआतील मुलांचा संघ विजयी झाला. या संघाची जिल्हास्तरावर निवड झाली. यासाठी आमच्या विद्यालयातील हेमंत गोरे, अमोल पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या विजयामुळे संस्थेचे अध्यक्ष डॉ.सत्यजित पूर्णपात्रे आणि संस्थेच्या सचिव ताईसाहेब डॉ.शुभांगी पूर्णपात्रे आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक पारस परदेशी आणि सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी व सहकारी शिक्षकेतर कर्मचारी वृंदांनी या यशस्वी संघाचे अभिनंदन आणि गोड कौतुक केले. या यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या.

# गणाधीश शालेय कॅरम स्पर्धा ५ सप्टेंबरला

■ मुंबई

**बाळ** गोपाळ (अभिलाषा) गणेशोत्सव मंडळ(काळाचौकी)व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे माजी नगरपाल डॉ.जगन्नाथराव हेगडे पुरस्कृत विविध जिल्ह्यांतील १८ वर्षांखालील इयत्ता १२ वीपर्यंत शालेय मुलामुलींसाठी गणाधीश चषक विनाशुल्क कॅरम स्पर्धा ५ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आली.विभागीय ज्युनियर खेळाडूंच्या उत्स्फूर्त मागणीनुसार आणि गत स्पर्धेस लाभलेल्या मोठ्या प्रतिसादामुळे शालेय कॅरम स्पर्धा आमच्या गणेशोत्सवामधील एक अविभाज्य उपक्रम ठरत असल्याची माहिती गणाधीश मंडळाचे अध्यक्ष स्वप्नील शिंगे व सेक्रेटरी सिध्देश ढोलम यांनी दिली.

चँम्पियन कॅरम बोर्डवर ही स्पर्धा बाद पध्दतीने काळाचौकी येथील गणाधीश श्री मंडपात होईल. पहिल्या ८ विजेत्या-उपविजेत्यांना आकर्षक चषक व स्ट्रायकर पुरस्कार देऊन माजी नगरपाल डॉ.जगन्नाथराव हेगडे यांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.खेळाडूंना स्पर्धेदरम्यान विशेष मार्गदर्शन देखील मोफत लाभणार आहे.या स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या संबंधित शालेय खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी रवींद्र गोनबरे किंवा अविनाश महाडिक यांच्याकडे २२ ऑगस्टपर्यंत संपर्क साधावा.

# कनिष्ठ विश्व बॅडमिंटन स्पर्धा गुवाहाटीत ६ ऑक्टोबरपासून

■ नवी दिल्ली

**विश्व** बॅडमिंटन फेडरेशनची कनिष्ठांची विश्व बॅडमिंटन चॅम्पियनशिप स्पर्धा गुवाहाटीत ६ ते १९ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे.भारत या स्पर्धेचे यजमानपद भूषवित असून २५सदस्यांचा भारतीय कनिष्ठ बॅडमिंटन संघ जाहीर करण्यात आला.या संघामध्ये दर्जेदार कामगिरीचे सातत्य राखणारे युवा बॅडमिंटनपटू तन्वी शर्मा,उन्नती हुडा त्याचप्रमाणे मुलांच्या दुहेरीत प्रतिनिधीत्व करणाऱ्या भार्गव राम अरिगेला आणि विश्वतेज गोब्बुरु यांचा समावेश आहे. या संघामध्ये आशियाई कनिष्ठ बॅडमिंटन चॅम्पियनशिप स्पर्धेत कांस्यपदक विजेत्या व्हिनेला कलागोठला आणि रक्षिता श्री यांनाही संधी देण्यात आली आहे.सुहानदिनता चषकासाठी (मिश्र सांघिक बॅडमिंटन चॅम्पियनशिप स्पर्धा) ६ ते ११ ऑक्टोबर दरम्यान घेतली जाईल.त्यानंतर १३ ते १९ ऑक्टोबर दरम्यान वैयक्तिक गटातील सामने खेळविले जातील. या स्पर्धा भारतात होत असल्याने त्याचा लाभ भारतीय कनिष्ठ बॅडमिंटनपटूंना अधिक होईल, अशी आशा अखिल भारतीय बॅडमिंटन संघटनेचे सचिव संजय मिश्रा यांनी व्यक्त केली.

**भारतीय कनिष्ठ बॅडमिंटन संघ**

**मुले एकेरी (१९वर्षांखालील)**

रोनक चौहान, ज्ञाना दत्तु,ललितझुला एच., सुर्याक्ष रावत, मुली एकेरी (१९वर्षांखालील)- तन्वी शर्मा, व्हेनेला कलागोटला, उन्नती हुडा, रक्षिता श्री

**मुले दुहेरी (१९वर्षांखालील)**

ए.आर. सुमित-भव्या छाब्रा, भार्गवराम अरिगेला-विश्वतेज गोबरु, विष्णू कोडे-मिथिलीश पी. कृष्णन, मुली दुहेरी (१९ वर्षांखालील)-व्हेनेला कलागोटला-रेशिका, गायत्री रावत-मानसा रावत,अनया बिस्त-अँजेल पुणेरा, मिश्र दुहेरी(१९ वर्षांखालील)-भव्या छाब्रा-विशारवा टोप्पो, सी. लालरेमसेंगा-तारिणी सुरी, विष्णू कोडे-किर्ती मनचला, वनश देव-दियांका वालडिया.

# तिरंदाजी लीग स्पर्धेसाठी भारतीय खेळाडू जाहीर

■ नवी दिल्ली

**भारतामध्ये** पहिल्यांदाच होणाऱ्या आयपीएलच्या धर्तीवर तिरंदाजी प्रीमियर लीग स्पर्धेसाठी अखिल भारतीय तिरंदाजी संघटनेने भारतीय तिरंदाजपटूंची घोषणा केली. या स्पर्धा पुरूष आणि महिला विभागात रिकर्व्ह आणि कंपाऊंड अशा २ प्रकारांत घेतली जाणार आहे.

या स्पर्धेत जगातील विविध देशांचे अव्वल तिरंदाजपटू सहभागी होणार आहेत. आयपीएल स्पर्धेच्या धर्तीवर या स्पर्धेतही फ्रांचायझींचा सहभाग राहील. या स्पर्धेसाठी जागतिक तिरंदाजपटूंच्या मानांकनातील आघाडीच्या १० तिरंदाजपटूंना त्याचप्रमाणे विश्व मानांकनातील पहिल्या २० तिरंदाजपटूंना संधी देण्यात येणार आहे.

ऑलिम्पिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करणारे तिरंदाजपटू दीपिका कुमारी आणि धिरज बोमदेवरा यांच्या नावांचा समावेश आहे.रिकर्व्ह तिरंदाजी प्रकारात दीपिका कुमारी, धिरज बोमदेवरा आणि कंपाऊंड प्रकारातील भारतीय जोडी ऋषभ यादव आणि ज्योती सुरेखा वेन्नम, प्रथमेश फुगे, प्रियांश आणि परणीत कौर या या स्पर्धेत भाग घेणार आहेत.या स्पर्धेसाठी अलिकडेच अखिल भारतीय तिरंदाजी संघटनेने निवड चाचणी घेतली. या चाचणीनंतर रिकर्व्ह प्रकारात भारताचे ज्येष्ठ ऑलिम्पियन तिरंदाजपटू तरुणदीप राय, अतेनु दास तसेच महिलांच्या विभागात अंकित भक्त आणि भजन कौर हे सहभागी होणार आहेत.

# टेनिसपटू काईल एडमंडची ३० व्या वर्षी निवृत्तीची घोषणा

■ लंडन

**ब्रिटनचा** माजी टॉपसिडेड पुरुष टेनिसपटू काईल एडमंडने आंतरराष्ट्रीय टेनिस क्षेत्रातून आपल्या वयाच्या ३० व्या वर्षी निवृत्तीची घोषणा केली.३०वर्षीय एडमंडने आपल्या वैयक्तिक टेनिस कारकिर्दीत एटीपी टूरवरील दोन स्पर्धा जिंकल्या. २०१८ साली त्याने ऑस्ट्रेलियन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीत उपांत्य फेरी गाठली होती.असा पराक्रम करणारा तो अँन्डी मरेनंतरचा ब्रिटनचा दुसरा टेनिसपटू आहे. तब्बल ७९ वर्षांनंतर डेव्हीस चषकावर नाव कोरणाऱ्या ब्रिटनच्या डेव्हिस चषक संघामध्ये एडमंडचा समावेश होता. तसेच त्याने २०१६च्या ऑलिम्पिक स्पर्धेत ब्रिटनचे प्रतिनिधीत्व केले होते.

**CSB Bank** Trusted Heritage Smart Future

**PUBLIC NOTICE ON AUCTION OF PLEDGED GOLD ORNAMENTS**

The borrower/s in specific and interested bidders,in general, are hereby informed that on account of non-repayment of the Banks due by the borrowers as under despite the payment notice and recall/auction notice issued by the Bank, the gold ornaments pledged with the bank security by the respective borrowers for the loan availed by them will be sold in public auction on "as is where is" and "non-recourse" basis through e-auction portal https://gold.samil.in on 28th August 2025 at 10.30 AM The auction may be adjourned to any other later date at the discreation of the bank upon publication of the same in the Bank's notice board. The borrowers are hereby further inform that the gold ornaments will be disposed of by private sale if the public auction is not successful and if there is a further balance to be recovered thereafter, legal action will be initiated against the borrower/s for recovery of the balance amounts due to the bank. In case of diseased borrower, all conditions will be applicable to legal heirs

| S. No. | Account Name | Client ID | No.of Acc. | Bal.Outstanding as on 19/08/2025 | Weight (grams) |
|---|---|---|---|---|---|
| | **MULUND - MUMBAI** | | | | |
| 1 | DEEPTI SUNILKUMAR KANTHER | 7401263 | 001 | 2,12,998.00 | 46.00 |
| 2 | JAYESH CHATARLAL JAIN | 3001074 | 001 | 44,826.10 | 10.00 |
| 3 | MAYA RAJU WANKHEDE | 4353730 | 001 | 5,10,207.00 | 92.70 |
| 4 | MRITUNJAY ARVIND GUPTA | 8154072 | 001 | 7,34,937.75 | 138.40 |
| 5 | NEELAM NINAD MAHAJAN | 7355615 | 001 | 82,672.00 | 20.90 |
| 6 | SUSHILA DEVI | 7600318 | 001 | 1,03,864.00 | 22.60 |
| | **VASHI** | | | | |
| 7 | KUSHAL PRALHAD SONAWANE | 4860483 | 001 | 93,872.50 | 22.50 |
| 8 | VIJAY CHHAGAN MEDKAR | 8148986 | 001 | 3,79,902.00 | 89.70 |
| | **KALYAN** | | | | |
| 9 | SONALI LAXMAN GAMBHIRE | 2650912 | 001 | 1,74,692.00 | 34.49 |
| | **THANE** | | | | |
| 10 | HARSHIL JAIN | 7469892 | 003 | 4,60,668.01 | 92.90 |
| | **VILE PARLE** | | | | |
| 11 | MURUGAN MARIAPPAN DEVENDRA | 7020724 | 001 | 1,84,163.24 | 35.00 |
| | **ANDHERI WEST** | | | | |
| 12 | NEHA NAVNEET RANJANKAR | 3286620 | 001 | 2,86,888.00 | 69.90 |
| | **NERUL - NAVI MUMBAI** | | | | |
| 13 | VINOD KUMAR NAIR | 4254262 | 002 | 1,42,340.00 | 31.30 |
| | **AURANGABAD** | | | | |
| 14 | MRIDUL MAJUMDAR | 4578449 | 001 | 83,642.00 | 38.60 |
| | **KOLHAPUR** | | | | |
| 15 | JAYSING SUDAM KAMBLE | 7962344 | 001 | 1,04,134.00 | 17.97 |
| 16 | SACHIN SARJERAO JADHAV | 4130888 | 001 | 94,195.00 | 24.60 |
| | **MARKET YARD** | | | | |
| 17 | GAURAV PRAKASH SONAR | 4950998 | 002 | 1,17,147.00 | 20.65 |
| | **DONAWADE** | | | | |
| 18 | DEEPAK BAJIRAO PATIL | 7482394 | 004 | 4,60,223.52 | 83.66 |
| 19 | SAGAR JOTIRAM PATIL | 4445542 | 002 | 3,73,764.00 | 60.86 |
| 20 | SUNIL PANDURANG KADAM | 7509089 | 002 | 6,08,487.00 | 104.79 |
| | **KEDGAON** | | | | |
| 21 | REVANNATH ISHWAR PAWAR | 4879348 | 002 | 3,19,280.00 | 58.68 |
| | **KHED** | | | | |
| 22 | VISHAL VINAYAK SAKHARKAR | 7888528 | 001 | 62,867.00 | 12.30 |

For more details/account wise information borrowers/interested bidders may contact respective branches and for participating in the auction, please visit/login to the e-auction portal https://gold.samil.in

**MAHARASHTRA | Date : 21.08.2025** **Sd/- Authorized Officer, CSB Bank**

# ढगफुटीनंतर अश्रुंचा बांध फुटला......

**निसर्गापुढे कोणाचेच काही चालत नाही , याचा प्रत्यय मराठवाड्यात पुन्हा एकदा आला. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात ढगफुटीनंतर एकाच रात्रीत शेकडो जनावरे पुराच्या पाण्यात वाहून गेली. तर आठ जणांना आपला जीव गमवावा लागला. एनडीआरएफच्या पथकाने अनेक जणांना सुखरूप बाहेर काढले. त्यानंतरच बचाव कार्य वेगाने सुरू झाले. रात्री जेवण करून झोपलेल्या नागरिकांना सकाळची पहाट पाहता येणार नाही, असे स्वप्नातही वाटले नव्हते. कंधार तालुक्यातील कोटबाजार येथील एका कुटुंबातील पती व पत्नी दोघेही घराची भिंत अंगावर पडल्याने जागीच मरण पावले तर पुराच्या पाण्याने गावागावात अतोनात हाल करीत परिसीमाच गाठली. पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या नागरिकांचे मृतदेह शोधण्यासाठी २४ तास लागले. पावसाचा जोर व पुराचे पाणी पाहून स्वत:चा जीव वाचविता येईल की नाही ? अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली होती. मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, लातूर व परभणी जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झाले.**

**मराठवाड्यात** सतत दोन दिवस सर्वत्र पावसाचा धुमधडाका सुरू होता. पावसाने रौद्ररूप धारण केल्यामुळे सर्वत्र हाहाकार उडाला.नांदेड,हिंगोली, लातूर व परभणी जिल्ह्यातील हजारो हेक्टरवरील खरीप पिके पाण्याखाली गेली आहेत. अचानक आलेला पाऊस व पुरामुळे गोठ्यात बांधलेली जनावरे देखील वाहून गेली. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात ढगफुटी झाल्यानंतर परिस्थिती हाताबाहेर गेली. २४ तासात पाच जणांचे मृतदेह सापडले. तर अन्य पाच जण बेपत्ता झाल्यानंतर त्यांचा शोध घेण्यासाठी लष्कराच्या पथकाला पाचारण करावे लागले. त्या पथकालाही पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्यांचा शोध घेण्यासाठी बराच वेळ लागला. मराठवाड्यात झालेल्या या अतिवृष्टीमुळे शेकडो जनावरे पाण्यात वाहून गेले. मराठवाड्यातील अनेक शेतकऱ्यांचे गोधन पुराच्या पाण्यात हरपले आहे. त्यांना शोधत असताना शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू येत आहेत. एकीकडे ढगफुटीने हाल केलेले असताना ऐन पोळा सण तोंडावर असताना गोधन हरपल्याने शेतकऱ्यांच्या अश्रुंचा बांध फुटला आहे. दूध देणारी म्हैस तसेच गाय-वासरू,बकरी,कोंबड्या या पाण्यात वाहून गेल्या.लातूर जिल्ह्यातील उदगीरमध्येही खूप मोठा पाऊस झाला. त्या ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले. नांदेड जिल्ह्यातील मुक्रमाबादजवळ एका चार चाकी वाहनातील तीन महिला व तीन पुरुष पुराच्या पाण्यात वाहून गेले. मराठवाडा व विदर्भाला जोडणारा किनवट जवळील पूल पाण्याखाली बुडाल्याने येथील वाहतूक पूर्णपणे बंद होती.



मराठवाड्यात खूप मोठा पाऊस झाल्याने कापणीला आलेले सोयाबीन हातचे गेले. सततच्या पावसामुळे कापूस, तूर ,सोयाबीन, हळद व उसाचे मोठे नुकसान झाले. या मुसळधार पावसामुळे शेतात असलेले पीक नसल्यात जमा झाले.

मुखेड तालुक्यातील हसनाळ या गावात खूप मोठा पाऊस झाला. गावात पूर आल्यामुळे पाण्यात वाहून गेलेली ललिताबाई भोसले , भिमाबाई हिराबन मादाळे व गंगाबाई गंगाराम मादाळे या तिघांचा मृत्यू झाला. तसेच सहा जण वाहून गेले होते. त्यापैकी चंद्रकला विठ्ठल शिंदे या (४५वर्षीय) महिलेचे प्रेत दुसऱ्या दिवशी शोध पथकाला आढळले. नांदेड जिल्ह्यातील लेंडी प्रकल्पबाधित क्षेत्रात बुडालेल्या गावांमध्ये थेट लष्कराकडून बचाव कार्य सुरू होते. दरम्यान नांदेड जिल्ह्यातील मुखेड व लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्याच्या सीमेवर धडकनाळ येथील पुलावरून चार पुरुष, तीन महिला असलेली कार तसेच एक ऑटो पुराच्या पाण्यात वाहून गेला. त्यापैकी तीन पुरुषांना पथकामार्फत वाचविण्यात आले. नांदेड जिल्ह्यातील मुखेडजवळील रावणगाव येथे २२५ नागरिक पुराच्या पाण्यात अडकले होते तर हसनाळ या गावातून आठ जणांना पथकाने सुखरूप बाहेर काढले. तशीच परिस्थिती भासवाडी या गावातील होती. त्या ठिकाणी असलेले वीस नागरिक पुरामध्ये अडकले होते. तर मुखेड तालुक्यातील भिंगेली येथील ४० नागरिक पुराच्या पाण्यात अडकल्याने त्यांना वाचविण्यासाठी एनडीआरएफ पथकाला पाचारण करावे लागले. या पथकाला पाचारण केल्यानंतरच प्रत्यक्षात पूरग्रस्तांना वाचविण्यात यश आले. हे पथक वेळेवर आले नसते तर कदाचित मराठवाड्यात मृत्यूचा आकडा खूप मोठा वाढला असता , तालुक्यातील भेंडेगाव संपूर्ण पाण्याखाली वेढले गेले होते. तर दोन गावाला जोडणारा बेरळी पूल वाहून गेल्याने संपूर्ण गावात पाणी शिरले. मराठवाड्यातील नांदेड , लातूर, हिंगोली व परभणी जिल्ह्यात पावसाने



**डॉ. अभयकुमार दांडगे**
**मराठवाडा**


हाहाकार माजविला होता. यापूर्वी कधीही एवढा मोठा पाऊस पडला नव्हता, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली. काही ज्येष्ठ नागरिकांनी या पावसाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना असेही सांगितले की, एवढा मोठा पाऊस १९८२ नंतरच पहावयास मिळाला.

**मंत्री गिरीश महाजन यांची भेट**

नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त हसनाळ गावास आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी भेट दिली. गावातील नागरिकांच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या. मुखेड तालुक्यातील बारा गावांना पाण्याचा वेढा असल्याने त्यांना अनेक ठिकाणी पोहोचता आले नाही. हसनाळ (प.मु.) या गावात पुराचे पाणी शिरल्यामुळे पाच जणांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण गावात शोककळा पसरली. गावातील मयत पिराजी म्हैसाजी थोटवे (वय ७०,) चंद्रकला विठ्ठल शिंदे (वय ४५,)ललिताबाई भोसले (वय ६०,) भीमाबाई हिरामण मादाळे( वय ६५,) गंगाबाई गंगाराम मादाळे (वय ६५ ) यांच्या कुटुंबियांची मंत्री महाजन यांनी भेट घेतली. मराठवाड्यातील अनेक मंत्री एका वर्तमानपत्राच्या पुरस्कार सोहळ्यानिमित्त लंडनला आहेत. त्यामुळे त्यापैकी कोणीही या पूरग्रस्त भागात हजेरी लावू शकले नाही. सोशल मीडियावर मराठवाड्यातील अनेक नेत्यांविरुद्ध अपशब्द वापरणारे पोस्ट व्हायरल होत आहेत. १८ ऑगस्ट रोजी मुखेड - उदगीर रस्त्यावरील धडकनाळ येथील पुलावरून एक कार व एक ऑटोमधील सात जण पुराच्या पाण्यात वाहून गेले होते. यातील ३ जणांना वाचविण्यात उदगीर अग्निशमन दलाला यश आले. उर्वरित ४ बेपत्ता झालेल्यांपैकी ३ जणांचे मृतदेह सापडले.

सुदैवाने या घटनेत नारायण इबिते, (गौडगाव कर्नाटक,) आसिफ शेख, (उदगीर,) मोहम्मद शोएब, (निझामाबाद.) यांना वाचवण्यात पथकाला यश आले. चार बेपत्ता व्यक्तीपैकी तिघांचे मृतदेह सापडले आहेत. त्यांची नावे अशी आहेत- समीना शेख (वय ४८ रा. जागतियाल), तेलंगाणा ,हसीना शेख (वय २९ जागतियाल), तेलंगणा, महेबूब शेख (रा. गवंडगाव ता. देगलूर ).

एकंदरीत मराठवाड्यात झालेल्या पावसात नांदेड जिल्ह्याचे सर्वाधिक नुकसान झाले. मुखेड तालुक्यात ढगफुटी झाल्याने तेथील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. ज्यांच्या घरातील नागरिक या पावसामुळे मरण पावले त्यांना स्वतःचे अश्रू आवरता आले नाही. ढगफुटीचा कहर व त्यानंतर अश्रुंचा बांध फुटल्याने मुखेड तालुक्यावर खूप मोठी शोककळा पसरली आहे.



## पत्नीवर कुऱ्हाडीने हल्ला करून पतीची रेल्वेखाली आत्महत्या

■ जळगाव

**दारूच्या** नशेत आनंदा महारू धनगर (४२) याने पत्नीवर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला करून त्यानंतर स्वतः धावत्या रेल्वेखाली उडी मारून आत्महत्या केली. ही घटना जळगाव तालुक्यातील बोरनार येथे घडली.

जळगाव तालुक्यातील बोरनार येथील प्लॉट एरिया येथे आनंदा धनगर हा पत्नी रेखा व दोन मुलांसह राहात होता. काल सकाळी ६ वाजता किरकोळ कारणावरून पती-पत्नीमध्ये वाद झाला. या भांडणात पती आनंदाने पत्नी रेखा धनगर हिच्यावर लोखंडी कुऱ्हाडीने वार केले. यात पत्नी गंभीर जखमी झाली असून तिच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

पत्नीवर हल्ला केल्यानंतर आनंदा धनगर याने सकाळी ७ वाजता म्हसावद रेल्वे गेटजवळ धावत्या रेल्वेखाली उडी मारून आत्महत्या केली. या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी पोहचून मृतदेह ताब्यात घेतला.

## हिमाचल प्रदेशात दोनदा भूकंप

■ शिमला

**हिमाचल** प्रदेशातील चंबा येथे आज पहाटे दोन वेळा भूकंपाचे सौम्य धक्के बसले. सकाळी ३:२७ वाजताच्या सुमारास ३.३ रिश्टर स्केलचा पहिला धक्का बसला तर दुसरा धक्का ४:३९ वाजताच्या सुमारास ४ रिश्टर स्केलचा नोंदवला गेला .

नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजी (एनसीएस)नुसार, पहिल्या भूकंपाची खोली २० किलोमीटर तर दुसऱ्याची खोली १० किलोमीटर होती. सुदैवाने या दोन्ही भूकंपांमध्ये कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही.

## अकरावीच्या प्रवेशासाठी २२ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

■ मुंबई

**राज्यात** काही जिल्ह्यांमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता सर्वांसाठी खुल्या फेरीतून विद्यार्थ्यांना २२ ऑगस्टपर्यंत प्रवेश घेता येणार आहे. राज्यातील ९ हजार ५२५ कनिष्ठ महाविद्यालयांतील एकूण २१ लाख ५० हजार १३० जागांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे.

यात आतापर्यंत १२ लाख ३ हजार ४१६ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. या सर्वांसाठी खुल्या फेरीअंतर्गत प्रवेश न मिळालेले विद्यार्थी, पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थी तसेच एटीकेटी विद्यार्थी यांना विशेष संधी देण्यात आली आहे. यासाठी आधीची मुदत १७ ऑगस्टपर्यंत होती. पण राज्यातील अनेक जिल्ह्यांत मुसळधार पावसामुळे उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना सुट्या देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेसाठी अडचणी येऊ नयेत म्हणून आधी २० ऑगस्टपर्यंत वाढवलेली मुदत आता पुन्हा २२ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आली आहे.

## बुलडाण्यात बैलपोळा घरी साजरा करण्याचे आदेश

**जिल्ह्यात लंपी संसर्गाचा फैलाव**

■ बुलडाणा

**बैलपोळा** हा शेतकऱ्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा सण, पण यंदा बुलडाणा जिल्ह्यात लंपी संसर्गामुळे जिल्हा प्रशासनाने बैलपोळा घरगुती स्वरूपातच साजरा करण्याचे आदेश दिले आहेत. जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी हे आदेश जारी करत सार्वजनिक मिरवणूक, यात्रा, बाजार आणि जनावरांच्या वाहतुकीवर बंदी घातली आहे.

बैलपोळ्याच्या दिवशी पारंपरिकपणे शेतकरी आपले सर्जा-राजा सजवून गावभर मिरवणूक काढतात. यंदा लंपीच्या वाढत्या संसर्गामुळे ही परंपरा गोठ्यापुरती मर्यादित



ठेवावी लागणार आहे. २२ ऑगस्टला बैलपोळा असून, तो फक्त घरगुती आणि साध्या पद्धतीनेच साजरा करावा, असे स्पष्ट आदेश प्रशासनाने दिले आहेत.

पशुसंवर्धन विभागाकडून लंपी नियंत्रणासाठी लसीकरण व उपचार सुरू असले तरी, ढगाळ हवामान आणि डासांच्या वाढीमुळे लसीकरणानंतरही संसर्गाचे प्रमाण काही ठिकाणी वाढताना दिसत आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून जनावरांना सार्वजनिक ठिकाणी नेण्यास पूर्ण बंदी आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल.

## कामगार राज्य विमा महामंडळातर्फे 'स्प्री- २०२५' योजनेची जनजागृती

■ मुंबई

**कामगार** राज्य विमा महामंडळ (ईएसआयसी) आणि मुंबई लेबर युनियन, पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचा उद्देश ईएसआयसीच्या 'स्प्री- २०२५' योजनेबद्दल कामगार आणि नियोक्त्यांमध्ये जागरूकता वाढविणे हा होता.

या बैठकीत, ईएसआयसीच्या विविध योजना आणि त्यांच्या लाभांविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. 'स्प्री-२०२५' (नियोक्ता आणि कर्मचाऱ्यांच्या नोंदणीला प्रोत्साहन देण्यासाठी योजना) या विशेष योजनेवर लक्ष केंद्रित करण्यात आले. ही योजना कामगार व रोजगार तसेच युवा व्यवहार व क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांच्या अध्यक्षतेखाली शिमला येथे झालेल्या ईएसआयसीच्या १९६ व्या बैठकीत मंजूर करण्यात आली. 'स्प्री- २०२५' योजनेपूर्वी, वेळेवर नोंदणी न केल्यास कायदेशीर कारवाई आणि मागील थकबाकीची मागणी केली जात असे. या नवीन योजनेमुळे, हे सर्व अडथळे दूर झाले आहेत. त्यामुळे, पूर्वी सामाजिक सुरक्षेच्या कक्षेत नसलेले कामगार व आस्थापना आता कोणत्याही भीतीशिवाय नोंदणी करू शकतील आणि ईएसआयसी कायद्यांतर्गत आरोग्य आणि सामाजिक लाभांचा फायदा घेऊ शकतील.

## तुळजाभवानी कळसाबाबत २० दिवसांत अहवाल द्या

■ धाराशिव

**तुळजाभवानी** मंदिराच्या गर्भगृहावरील शिळांना गेलेल्या तड्यांमुळे मंदिराच्या कळसाबाबत मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. भारतीय पुरातत्त्व विभागाच्या तज्ज्ञांनी मंदिराची पाहणी करून आपले निष्कर्ष वरिष्ठांकडे कळवले असले, तरी अद्याप अधिकृत लेखी अहवाल सादर केलेला नाही. त्यामुळे मंदिराचा कळस उतरवायचा की नाही, या निर्णयाबाबत संभ्रम आहे. सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी आयआयटीच्या तज्ज्ञांना तपासणीत सामावून घेऊन २० दिवसांत नवा अहवाल तयार करण्याच्या सूचना केल्या आहेत.

नागपूर, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर येथील पुरातत्त्व विभागातील तीन अधिकाऱ्यांनी आपापली मते नोंदवली आहेत. मात्र, या मतांत एकमत नाही. प्राथमिक अहवालात काही नकारात्मक निरीक्षणे नोंदवली असली तरी अधिकृत लेखी अहवाल न मिळाल्यामुळे अंतिम निर्णय घेणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आशिष शेलार यांनी विशेष बैठक घेतली.

## बोरीवली येथील वृत्तपत्र विक्रेते मच्छिंद्र दोंड यांचे देहावसान

■ मुंबई

**बोरीवली** पश्चिम येथील ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते मच्छिंद्र दोंड यांचे नुकतेच अल्पकालीन आजाराने दुःखद निधन झाले. वयाच्या ८३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. १९६९ साली मच्छिंद्र दोंड हे बोरीवली येथे आले.

बोरीवली पश्चिम येथे रेल्वे स्थानकाच्या जवळ वृत्तपत्र विक्रेते म्हणून त्यांनी अनेक वर्षे मुंबईतील वृत्तपत्र व्यवसायाची सेवा बजावली. त्यांच्या पत्नी, मुलगा सुनील आणि सून सुवर्णा हेही वृत्तपत्र विक्रेते म्हणून कार्यरत आहेत. मच्छिंद्र दोंड यांच्या निधनामुळे या परिसरातील वृत्तपत्र विक्रेते तसेच या व्यवसायाशी संबंधितांमध्ये शोककळा पसरली आहे.

## अतिवृष्टीमुळे २० लाख एकर जमीन बाधित! कृषिमंत्री भरणेंची माहिती

■ वाशिम

**राज्यात** झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले आहे. याच पार्श्वभूमीवर राज्याचे कृषिमंत्री आणि वाशिमचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज वाशीम दौऱ्यात शेतकऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी भरणे म्हणाले की, अतिवृष्टीमुळे राज्यातील १९ जिल्ह्यांवर फटका बसला असून तब्बल २० लाख १२ हजार ७७५ एकर क्षेत्र बाधित झाले आहे. या क्षेत्रातील पिके पूर्णपणे नष्ट झाली आहेत.

ते पुढे म्हणाले की, या नुकसानीत प्रामुख्याने सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग यांसह इतर पिकांचा समावेश आहे. राज्यात सर्वाधिक नुकसान नांदेड जिल्ह्यात ७ लाख १३ हजार ८५७ एकर क्षेत्रावर, तर दुसऱ्या क्रमांकावर वाशीम जिल्ह्यात ४ लाख ११ हजार ३९२ एकर क्षेत्रावर झाले आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार करता सर्वाधिक नुकसान वाशीम जिल्ह्यात झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे सुरू केले असून अहवाल मिळाल्यानंतर तातडीने शेतकऱ्यांना मदत दिली जाईल. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. नुकसानग्रस्तांना त्वरित मदत मिळावी यासाठी सर्व यंत्रणा कामाला लागली आहे.

## पावसाच्या पाण्यात पडून वसईत वृद्ध महिलेचा मृत्यू

■ मुंबई

**वसई** पश्चिमेतील विशालनगर परिसरात साचलेल्या पाण्यात पडून ६० वर्षीय लिलाबाई रोहम या वृद्ध महिलेचा मृत्यू झाला. काल दुपारी ही घटना घडली. लिलाबाई रोहम या विशालनगर येथील भगवती अपार्टमेंटमध्ये राहत होत्या. आपल्या घराजवळ साचलेल्या चार ते पाच फूट पाण्यातून चालत असताना त्या घसरून पडल्या. शेजाऱ्यांनी त्यांना पाण्यातून बाहेर काढले. मात्र, रस्त्यांवर पाणी साचलेले असल्यामुळे वाहतूक सुरू नव्हती. त्यामुळे त्यांना तत्काळ रुग्णालयात घेऊन जाणे शक्य झाले नाही.

## भारत-फ्रान्समध्ये ६३ हजार कोटींचा जेट विमान खरेदीचा करार

■ नवी दिल्ली

**भारत** सरकारने फ्रान्सच्या राफेल जेट कंपनीबरोबर २६ जेट विमाने खरेदीसाठी ६३,८८७ कोटी रुपयांच्या कराराला अंतिम रुप दिले आहे. ही राफेल मरीन जेट विमाने आयएनएस विक्रांत या युद्धनौकेवरुन संचालित करण्यात येणार आहेत.

भारतीय नौदलाच्या ताफ्यात २०३० पर्यंत ही विमाने दाखल होणार आहेत. यातील ९ विमाने २०२८ मध्ये १२ विमाने २०२९ मध्ये व २०३० मध्ये उर्वरित ५ विमाने भारतात येतील. अणुबॉम्ब वाहून नेण्याची क्षमता असलेली ही विमाने अत्याधुनिक असून त्यामुळे भारतीय नौदलाची हवेतील शक्ती अधिक वाढणार आहे. भारताने या आधीही फ्रान्सकडून ४८ हजार कोटी रुपयांची जेट विमाने घेतलेली आहेत.

## नर्सिंग शिकणाऱ्या १९ वर्षांच्या तरुणीची भंडाऱ्यात आत्महत्या

■ भंडारा

**भंडारा** जिल्ह्यातील साकोली येथे प्रेरणा खोब्रागडे या १९ वर्षीय नर्सिंग शिकणाऱ्या तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी तिने एक चिठ्ठी लिहिली होती. मी स्वतः आत्महत्या करत आहे. माझ्या मृत्यूला कुणालाही जबाबदार धरू नये, असे चिठ्ठीत लिहिले होते.

प्रेरणा खोब्रागडे ही गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातील पंचवटी गावची रहिवासी होती. नर्सिंग शिक्षणासाठी ती भंडारा जिल्ह्यातील साकोली येथे मामाकडे राहत होती आणि स्थानिक नर्सिंग महाविद्यालयात प्रशिक्षण घेत होती. आज सकाळी घरात ती गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली. कुटुंबियांनी ही बाब लक्षात येताच त्यांनी तत्काळ घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात हलवला.

## शेअर बाजारात पुन्हा तेजी दोन्ही निर्देशांक वधारले

**मुंबई** - देशांतर्गत शेअर बाजारात आज पुन्हा एकदा तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स २१३ अंकांनी वाढून ८१,८५७ अंकांवर तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी ६९ अंकांच्या वाढीसह २५,०५० अंकांवर बंद झाला.

सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये वाढ झाली असता दुसरीकडे बँक निफ्टीमध्ये मात्र घसरण झाली. बँक निफ्टी १६६ अंकांनी घसरून ५५,६९८ अंकांवर बंद झाला. आजच्या व्यवहारांत माहिती तंत्रज्ञान आणि ग्राहकोपयोगी वस्तूंच्या क्षेत्रातील कंपन्यांच्या समभागांची जोरदार खरेदी झाली. यात इन्फोसिस आणि टिसीएस या कंपन्या आघाडीवर राहिल्या.

**ज्याप्रमाणे २०००च्या दशकाच्या सुरुवातीला बॉलीवूडच्या ऐतिहासिक चित्रपटांमध्ये शहीद भगत सिंगची जीवनकथा रुपेरी पडद्यावर दाखवण्यासाठी स्पर्धा निर्माण झाली होती, तसेच काही वर्षांपूर्वी बांग्लादेशाच्या स्वतंत्रता संग्रामातील भारतीय देशभक्तीला ओटीटीवर दाखवण्याचा प्रयत्न सध्या सुरू आहे. काहीच दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेल्या सलाकार या सीरिजमध्ये भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (एनएसए) अजित डोभाल यांच्या कारकिर्दीला काल्पनिक रूप देण्याचा प्रयत्न करण्यात आला. आता १९७० च्या दशकात पाकिस्तानच्या अण्वस्त्र बनवण्याच्या गुप्त मिशनचे उघडकीस आणणाऱ्या एका गुप्तचर हेरावर आधारित सारे जहाँ से अच्छा ही सीरिज गेल्या आठवड्यात नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाली आहे. एकूण सहा एपिसोड असलेली ही सीरिज सलाकारशी साम्य दर्शवणारी असली तरी या सीरिजची कक्षा व्यापक आहे.**

# एकदा बघायला हरकत नाही

# सारे जहाँ से अच्छा

परीक्षण

देशाच्या सुरक्षेसाठी सीमेवर लढणाऱ्या शूर, पराक्रमी सैनिकांचे किस्से आपण नेहमीच मोठ्या अभिमानाने ऐकत व ऐकवत असतो. परंतु काही शूर असेही असतात ज्यांच्यासाठी कुठलेही शौर्यगान होत नाही. काही लढवय्ये असतात, ज्यांची कुठलीही शौर्यगाथा नसते. त्यांची हिम्मत आणि बुद्धिमत्तेची कथा कुठे लिहिली जात नाही. असे कितीतरी अज्ञात हिरो गुप्तहेर बनून देशासाठी निर्माण होणारा धोका थांबवण्याचे काम करतात, त्यासाठी आपले प्राण पणाला लावतात.

**'सारे जहां से अच्छा' चे कथानक**

सीरिजची कथा १९७० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात सुरू होते. त्यावेळी जगभरातील अनेक देश परमाणु ऊर्जा निर्माण करण्याच्या स्पर्धेत सामील झाले होते. नोबेल पुरस्कार विजेता शास्त्रज्ञ डॉक्टर होमी जहांगीर भाभा परमाणु ऊर्जेच्या बाजूने होते. त्यांचे मत होते की, परमाणु ऊर्जेमुळे युद्धस्थितीत देश स्वतःला सुरक्षित ठेवू शकेल. एका मुलाखतीत त्यांनी आपली ही इच्छा सांगितल्यानंतर काहीच दिवसांत विमान अपघातात त्यांचा मृत्यू झाला. त्यावेळी नुकतीच संघटित झालेली भारतीय इंटेलिजेंस एजन्सी - रॉचे बुद्धिमान गुप्तहेर विष्णु शंकर या अपघाताला थांबवण्यात अयशस्वी झाले होते आणि पुढे अनेक काळापर्यंत त्यांना या गोष्टीचे दुःख वाटत राहिले. याच दरम्यान रॉचे प्रमुख काओना माहिती मिळते की, १९७१ सालातील युद्धात मोठी हार पत्करलेले पाकिस्तानचे तत्कालीन अध्यक्ष जुल्फिकार अली भुट्टो आपल्या अपयशाचा बदला घेण्यासाठी परमाणु ऊर्जा निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यासाठी पाकिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणावर एक गोपनीय मिशन सुरू असून ते यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी त्याची जबाबदारी तिकडच्या गुप्तहेर संघटना आयएसआयचे आक्रमक अधिकारी मुर्तजा मलिक यांच्यावर सोपवण्यात आली आहे.






तर या पाकिस्तानी मिशनला अयशस्वी करण्याची जबाबदारी विष्णु शंकर घेतात. मुर्तजा आणि विष्णु यांचा हा सामना, चकमक कशी होते ते सीरिजमध्ये कळते.

**कशी आहे सीरिज ?**

सुमित पुरोहित यांनी दिग्दर्शित केलेली खर्या - वास्तविक घटनांवर आधारित ही काल्पनिक कथेवर आधारित सीरिजची सुरुवात चांगली झाली आहे. देशभक्तीने ओतप्रोत ही सीरिज गुप्तहेरांच्या आव्हानात्मक जीवनावर प्रकाश टाकते. पटकथेची गती चांगली आहे आणि ती प्रेक्षकांना बांधून ठेवते. सीरिजच्या लेखकांनी रॉचे विष्णु शंकर यांच्याप्रमाणे आयएसआयचे एजंट मुर्तजाच्या व्यक्तिरेखेला देखील महत्त्व दिले आहे. ज्यामुळे दोघांमधील टक्कर, त्यांचा कार्यप्रवास, निर्णय हे रोचक बनले आहे. परंतु हा रोचकपणा शेवटपर्यंत पाहायला मिळत नाही. कारण शेवटी मिशनच्या सर्वात मोठ्या वळणावर लेखकांनी मुर्तजाला अतिशय कमजोर आणि त्रस्त होताना दाखवले आहे. त्यामुळे कथेचा थ्रिल आणि मुर्तजाचा प्रवास यामध्ये अन्याय केल्यासारखी वाटते. त्यामुळेच सीरिजचा क्लायमॅक्स कमकुवत बनला आहे. त्याचसोबत विष्णु ज्याप्रकारे सर्व गोष्टी कॉमेंट्री करत समजवतो, ते देखील अयोग्य वाटते.

**अभिनय**


या सीरिजमधील सर्व कलाकारांचा अभिनय चांगला आहे. प्रतीक गांधी, रजत कपूर, तिलोत्तमा शोम सारखे दमदार कलाकार या सीरिजला लाभले, हीच सीरिजची मोठी बाजू आहे. या कलाकारांमुळे व्यक्तिरेखा मजबूत होण्यासाठी मोठा हातभार लागला आहे. प्रतीक गांधीने आपली व्यक्तिरेखा दमदारपणे साकार केली आहे, आणि रजत कपूर व तिलोत्तमा शोम जेव्हा जेव्हा कथेमध्ये येतात, तेव्हा ते आपली छाप निर्माण करतात. सर्वात जबरदस्त काम केले आहे ते सनी हिंदुजाने. त्याने मुर्तजाच्या व्यक्तिरेखेमध्ये प्राण ओतला आहे. त्याचे उर्दू बोलणे आणि देहबोली यामुळे तो पाकिस्तानी उच्चाधिकारीच्या शोभला आहे. गुप्तहेर सुखबीरची भूमिका करणार्या सुहैल नायरने देखील आपल्या भूमिकेला योग्य न्याय दिला आहे. अनूप सोनी, कृतिका कामरा, कुणाल ठाकूर, निनाद कामत या कलाकारांनी देखील आपापल्या भूमिका समजून केल्या आहेत. तांत्रिकदृष्ट्या सीरिज चांगली बनली आहे.

कलाकारांचा चांगला अभिनय पाहण्यासाठी 'सारे जहां से अच्छा' ही सीरिज बघता येईल.

**वेब सीरीज़: सारे जहां से अच्छा**
**दिग्दर्शक: सुमित पुरोहित**
**पटकथा लेखक: भावेश मंडालिया, गौरव शुक्ला, मेघना श्रीवास्तव, अभिजीत कुमान, शिवम शंकर, इशराक शाह, कुणाल कुशवाह**
**कलाकार: प्रतीक गांधी, सनी हिंदुजा, सुहैल नायर, तिलोत्तमा शोम, अनूप सोनी, कृतिका कामरा, रजत कपूर, कुणाल ठाकूर**
**ओटीटी प्लॅटफॉर्म: नेटफ्लिक्स**
**रेटिंग: २.५/५**

# अनुराग का चिडला?

बॉलीवुड दिग्दर्शक अनुराग कश्यप आपल्या परखड आणि बिनधास्त वक्तव्यांसाठी देखील ओळखला जातो. यावेळी त्याच्या निशाण्यावर आहे लवकरच प्रदर्शित होणारा एआय जनरेटेड चित्रपट 'चिरंजीवी हनुमान - द इटरनल'. अबुंदंतिया एंटरटेनमेंट आणि कलेक्टिव्ह मीडिया नेटवर्कच्या हिस्ट्रीवर्स विभागाने मिळून या चित्रपटाची निर्मिती केली आहे. निर्मात्यांचा दावा आहे की एआय (AI) वापरून बनवलेला भारतातील हा पहिला चित्रपट आहे. पुढील वर्षी २०२६ मधील हनुमान जयंतीच्या दिवशी हा सिनेमा प्रदर्शित केला जाणार आहे. आता कलेक्टिव्ह मीडिया नेटवर्कचे संस्थापक-सीईओ आणि या सिनेमाचे निर्माता विजय सुब्रमण्यम यांच्यावर अनुराग कश्यप चिडला आहे. त्याने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर या चित्रपटाचे एक पोस्टर शेअर करत विजयवर जोरदार टीका केली आहे. त्याने लिहिले आहे की, एका बाजूला हे लोक , कलाकार, लेखक, आणि दिग्दर्शकांचे प्रतिनिधित्व करतात आणि दुसऱ्या बाजूला एआयद्वारे चित्रपट बनवत आहेत. अनुरागच्या मते हा अशा सृजनशीलतेचा विश्वासघात आहे. अनुरागने हा आरोप देखील केला आहे की, या निर्मात्यांचा उद्देश केवळ पैसे कमावणे हाच आहे. जेव्हा कलाकार यांच्यासाठी योग्य नफा मिळवून देऊ शकत नाहीत, तेव्हा निर्माते अशा आर्टिफिशियल इंटेलिजन्सची (कत्रिम बुध्दीमत्ता) मदत घेतात. ज्या कलाकारामध्ये, अभिनेत्यामध्ये स्वाभिमान आहे, त्यांनी अशा निर्मात्यांना प्रश्न विचारायला हवा आणि त्यांच्यासह काम करणे बंद केले पाहिजे. हिंदी चित्रपटसृष्टीतील अशा माणसांना पाठीचा मणका नसतो आणि त्यांची जागा गटारात आहे. अनुरागसह दिग्दर्शक विक्रमादित्य मोटवानीने सुध्दा या प्रोजेक्टची निंदा करत लिहिले आहे की, आता तर ही सुरुवात आहे. सर्व एआय करणार असेल, तर मग दिग्दर्शक आणि लेखकांची गरज आहे का? अनुरागच्या या टीकेवर विजय सुब्रमण्यम यांनी मीडियाला याचे उत्तर देत सांगितले की, या चित्रपटाचा उद्देश परंपरा आणि नव्या कल्पना यांचा संगम करण्याचा आहे. या प्रोजेक्टमध्ये सांस्कृतिक मूल्यांचा आदर केला जाईल.



# मराठी जेवण हे गरिबांचे जेवण ...

द काश्मीर फाइल्स नंतर दिग्दर्शक विवेक अग्निहोत्रीचा द बंगाल फाइल्स हा नवा सिनेमा प्रदर्शनाच्या वाटेवर आहे. या चित्रपटाचे प्रमोशन करण्याच्या हेतूने विवेक सध्या अनेक इंग्रजी वृत्तपत्रे आणि सोशल मीडियावर मुलाखती देत आहे. बिनधास्त बोलण्यासाठी विवेक कायम चर्चेत असतो. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीदरम्यान विवेक आणि त्याची अभिनेत्री पत्नी पल्लवी जोशीला आवडता पदार्थ कोणता असा प्रश्न विचारण्यात आला. तेव्हा पल्लवीने उत्तर दिले की, मी विवेकसाठी मराठी पदार्थ बनवले तर हा खात नाही आणि म्हणतो की, काय गरीबांचे खाणे बनवले आहेस? यावर विवेकने आपली बाजू मांडत सांगितले की, हे बघा, मी दिल्लीचा आहे आणि तिथली खाण्याची पद्धत वेगळी आहे. आमच्या खाण्यात तूप तरंगत असते आणि मसाल्यांचा वापर करतात. मला असेच खाणे आवडते. पण जेव्हा मराठी पदार्थ समोर येतात तेव्हा ते हेल्दी प्रकारचे असतात. त्यात जास्त मसालाही नसतो आणि तूपसुद्धा. त्यामुळे मी म्हणत असे की हे गरीबांचे खाणे आहे. विवेकने मराठी खाण्याविषयी केलेल्या या विधानानंतर सोशल मीडियावर त्याला खूप ट्रोल केले जात आहे.

# 'नो एन्ट्री'मध्ये नव्या कलाकारांची एन्ट्री




२००५ मध्ये प्रदर्शित झालेला 'नो एन्ट्री' या लोकप्रिय आणि ब्लॉकबस्टर सिनेमाच्या सिक्वेलची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. अनीस बज्मी दिग्दर्शित या सिनेमामध्ये सलमान खान, अनिल कपूर आणि फरदीन खान हे कलाकार होते. काही दिवसांपूर्वीच निर्माता बोनी कपूरनी या चित्रपटाच्या सिक्वेलची घोषणा केली होती. परंतु या सिक्वेलमध्ये जुन्या एकाही कलाकाराला न घेता वरुण धवन, अर्जुन कपूर आणि दिलजीत दोसांझ यांची निवड करण्यात आली. मूळ नो एन्ट्री मधील कलाकारांना सिक्वेलमध्ये का घेतले नाही याचा खुलासा आता बोनी कपूर यांनी एका मुलाखतीमध्ये केला आहे. ते म्हणाले की, सिक्वेलसाठी आम्ही संपूर्ण कास्ट बदलली आहे. पण जवळपास ८-१० वर्ष मी अनिल, सलमान आणि फरदीन यांना सिक्वेलमध्ये घेण्यासाठी विचारत होतो. त्यांच्या होकाराची खूप वाट पाहिली. परंतु गोष्टी जुळून आल्या नाहीत. मूळ कलाकारांचे सिक्वेलमध्ये नसणे ही गोष्ट त्रास देईल खरी, पण मी देखील आणखी किती काळ त्यांची वाट पाहणार हा प्रश्न होता.

# अर्जुन बनला मीम्स मटेरियल

सोशल मीडियावर कधी काय व्हायरल होईल, हे सांगता येत नाही. केवळ वर्तमानातीलच नव्हे, तर काही वर्षांपूर्वीच्या एखाद्या कलाकाराच्या, सेलिब्रिटीच्या वक्तव्याला नव्याने फोडणी देऊन ते व्हायरल केले जाते. असेच काहीसे अभिनेता अर्जुन कपूरच्या बाबतीत घडले आहे, ज्यामुळे बिचारा खूपच त्रस्त झाला आहे. लोक त्याच्या



एका जुन्या पोस्टच्या मीम्स बनवत त्या व्हायरल करत आहेत. त्याचा हा व्हिडिओ २०१७ मधील आहे. व्हिडिओमध्ये दिसत आहे की, हाफ गर्लफ्रेण्ड या आपल्या सिनेमाच्या एका प्रमोशनल कार्यक्रमादरम्यान अर्जुन कपूर एका पत्रकाराकडे रागाने बघत आहे. आता इतक्या वर्षांनी त्याच्या व्हिडिओवर विविध मीम्स बनवली जात आहेत. खूप व्हायरल होत असलेल्या त्याच्या एका मीम्समध्ये एका युजरने दादा साधूचे हो अंडरवर्ल्ड या गाण्याचे रिमिक्स बनवले आहे. इतकेच नाही, तर अर्जुन कपूरच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर केवळ हे मीम्स नव्हे, तर जुन्या पोस्टवर कमेंट्सचा पूर आला आहे. लोक वाट्टेल त्या कॉमेंट्स करून त्याला हैराण करत आहेत. त्यामुळे आता अर्जुनने आपले कॉमेंट्स बॉक्स बंद केले आहे.




# लवकरच 'अपने २'?


२००७ मध्ये दिग्दर्शक अनिल शर्मा यांचा कौटुंबिक चित्रपट अपने प्रदर्शित झाला होता. या सिनेमामध्ये तिघे देओल्स म्हणजे धर्मेंद्र, सनी देओल आणि बॉबी देओल यांनी एकत्र काम केले होते. हा चित्रपट आजही एक उत्तम कौटुंबिक चित्रपट मानला जातो. अनेक काळापासून अपने २ च्या चित्रपटाच्या सिक्वेलची चर्चा सुरू आहे. मात्र आता चित्रपटाचे दिग्दर्शक अनिल शर्मा यांनी अपने २ बद्दल खुलासा केला आहे. त्यांनी सांगितले की, अपने २ खरं म्हणजे २०२१ मध्ये सुरु होणार होता. परंतु सर्व कलाकारांच्या एकत्र तारखा मिळवणे शक्य नसल्याकारणाने चित्रपटाचे शूटिंग सुरू करता आले नाही. मला देओल कुटुंबासोबत चित्रपट बनवायची इच्छा आहे. अपने २ ची कथा मी तिन्ही देओलना ऐकवली तेव्हा धर्मेंद्र यांच्या डोळ्यात अश्रू आले होते, तर बॉबीने प्रेमाने मला जवळ घेतले होते. आता अपने २ चे स्क्रिप्ट पूर्ण झाले असून लवकरच आम्ही या चित्रपटाचे शूटिंग सुरू करणार आहोत. हा सिनेमा बनणार यात शंकाच नाही. या सिनेमामध्ये सनी देओलचा मुलगा करण देओलसुद्धा काम करणार आहे.

# 'राख'मध्ये अली

**अभिनेता** अली फजल चित्रपटांसह ओटीटीवर देखील मोठ्या प्रमाणात काम करत आहे. आत्तापर्यंत त्याने अनेक वेबसीरिजमध्ये दमदार अभिनय करून प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. आता राख या त्याच्या नव्या सीरिजची घोषणा करण्यात आली आहे. या नव्या वेबसीरिजमध्ये अली फजल पोलीस अधिकाऱ्याची भूमिका करत आहे, आणि ही सीरिज एक थ्रिलर व सस्पेंस विषयावर आहे. एंडमोलशाइन इंडिया आणि गुलबदन टॉकीजद्वारे निर्माण करण्यात येत असलेली राख ही सीरिज एक साइकोलॉजिकल थ्रिलर आहे. या सीरिजचे दिग्दर्शक प्रोसित रॉय असून अनुषा नंदकुमार आणि संदीप साकेत हे राखचे सहदिग्दर्शक आहेत. अली फजलसह या सीरिजमध्ये अभिनेत्री सोनाली बेंद्रे आणि आमिर बशीर हे प्रमुख कलाकार दिसणार आहेत. सीरिजमधील अली फजलचा फर्स्ट लूक नुकताच निर्मात्यांनी सोशल मीडियावर प्रदर्शित केला असून पोस्टरखाली लिहिले आहे की, न्याय राख से उठेगा. ही सीरिज पुढील वर्षी मेझॉन प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे.



# नवाकाळ शब्दकोडे-१३४९



**आडवे शब्द** – ३. भक्त, शिष्य ६. मचूळ, बेचव ९. रुची, स्वाद ११. खोकल्याचा गंभीर प्रकार १४. निपुण, प्रवीण १५. टोकाचा, अतिशय जास्त १८. भोपळ्याच्या वर्गातील एक फळभाजी, पटोलिका १९. वेदना, दुःख २०. नकार, विरोध २१. चक्कर, फेरी २३. साखर कारखान्यात बनणारा उग्र वासाचा एक पदार्थ २४. देव, देवगण २५. कब्जा, पकड, नियंत्रण २६. मैत्री, घसट, सलगी २८. निष्फळ आक्रोश ३२. घाव, प्रहार ३३. नाटकाचे स्टेज ३५. सीमा, बॉर्डर ३७. कंबर ३९. आवाज ४०. नौका ४१. असूया, मत्सर ४३. पांगापांग, बेकी ४६. जव ४८. इभ्रत ४९. कानवला ५१. तांब्या ५३. अहंकार ५४. कुत्र्यांचा उंची व महाग प्रकार ५६. कपाळ ५७. हिरवे रत्न ५९. चप्पल ६०. गर्दी, घोळका ६२. पदवी, किताब ६५. काम करून घेण्यासाठी तात्पुरते गोड बोलणे ६७. स्त्री, महिला ६८. या झाडापासून विड्याचा कात मिळतो. ६९. श्वशुर ७२. चोपडी, नोटबुक ७४. भ्रमरी, मुलींचे एक नाव ७५. मोठेपणा, थोरवी ७७. गावातली मूळ वस्ती, व्यापारी पेठ ७९. पोळीचा लहान प्रकार ८१. धुंदी ८३. कमतरता ८४. दूध पूर्ण आटवून केलेला पदार्थ ८५. सूड ८६. घोड्याचे पाऊल ८८. विशेष ९०. टोक ९१. कागदाचा अखंड तुकडा ९३. रसदार, मधुर ९५. पावलाचा मागचा भाग ९७. रक्तिमा ९८. रदबदली ९९. गव्हाची खीर १०१. वितरण १०३. चिन्ह, खूण १०५. खिन्न १०६. खेळातला जोडीदार १०७. यज्ञातले इंधन १०९. नुकसान, तोटा १११. वृद्धी ११२. टीका, मल्लीनाथी ११४. पक्ष्याचे पीस ११५. रात्रीचा पाऊस ११६. देखणा ११७. द्वारकेजवळ असलेला गिरनार पर्वत ११८. खाऊन टाकणे

**उभे शब्द** – १. गुंड २. बकरा ४. चरबी ५. अंगठ्यापासून सर्वात दूरचे बोट ६. हात राखून केलेला खर्च ७. कारागीर ८. ऋषी, मुनी ९. हा पक्षी चांदणे पितो अशी कविकल्पना आहे. १०. आयुर्वेदिक औषधाची गोळी ११. भोपळ्याची जात, कोकणात याचे तोंडीलावणे लोकप्रिय आहे. १२. झोपडी १३. सुंदर स्त्री १६. पौर्णिमा १७. रामायण-महाभारतातील शस्त्रजोडी २०. जंगल २२. पेढ्याच्या आकाराचे भांडे २३. मध २४. गुंडाळी २७. धनिक २९. नाराजी ३०. विक्रीचा भाव ३१. पाण्याचा कालवा ३२. अचानक ३४. उसाचा रस काढण्याचे साधन ३८. काठी ३९. अपशकुन ४१. प्रयोजन ४२. ज्यू लोकांची भाषा ४३. वात्रट, अवास्तव ४४. सुंदर रंगीत पंख असलेला कीटक ४५. पत्त्यांच्या डावात चौकट, बदाम, इस्पिकसारखी बारा पानांची मालिका ४६. सर्वांचे, सर्व समाजाचे ४७. दूध ४८. लगामाची दोरी ५०. अप्सरांपैकी एक ५२. चातुर्य, शहाणपण ५४. साडीचा पदर ५५. सूर्य ५८. मग्न, तल्लीन ६१. आईचे वडील ६३. मोठा नगारा ६४. न्याहारीतला एक दक्षिणी पदार्थ ६६. लेखनाचे एक साधन ७०. सुकुमार, कोमल ७१. ढीग ७३. तुच्छ ७६. ज्वराचा प्रकार, मलेरिया ७८. मूर्ख, भोट ७९. अत्यंत तप्त वाळू ८०. कंटक ८२. फांदी ८३. तीव्र, प्रखर ८७. खोगीर, जीन ८९. समुदाय, समूह, अनेक घटकांनी संपूर्ण ९०. हाड ९२. व्यक्तीला अंकित करण्यासाठी कथित जादूटोणा ९४. मदतीसाठी देवाला मारलेली हाक ९६. अस्थिर, जंगम मालमत्ता ९९. लग्नाच्या जेवणातला पारंपरिक गोड पदार्थ १००. आश्रय १०२. गस्त, राखण १०४. माफ करण्याजोगा अपराध १०५. नुकतेच उकळलेले १०६. भीक १०८. अल्प ११०. निद्रा १११. प्रवेश करायला जागा ११३. लवण ११४. पंधरवडा •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३४८चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. साखरपुडा ५. धनत्रयोदशी ९. दशा ११. आयाळ १२. नगद १४. लक्षण १६. चव १७. जाळ १८. गर्व १९. राजरोस २३. माकडहाड २५. सामसूम २७. गाजरगवत २९. टर ३०. पवन ३१. वारण ३३. पोक ३४. तगारी ३६. सागर ३७. भल्लातक ४०. मार ४१. डोमकावळा ४३. शिला ४४. खोड ४५. मलीन ४६. बरखास्त ४८. गुटगुटीत ५०. गत ५२. रेडा ५३. तारू ५४. पेज ५५. बावनकशी ५६. पोरकट ५८. विराट ५९. चवचाल ६१. मराळ ६३. वैराण ६५. दवा ६६. पाडवा ६८. पानगी ६९. लोणी ७०. जन ७१. बडगा ७२. नटसम्राट ७४. तह ७५. राजस ७६. टोळी ७७. हाट ७८. प्रियतमा ८१. नक्षा ८२. खेळ ८३. सध्या ८४. जय ८५. हाक ८६. अंगद ८८. धाक ९०. काजूकतली ९२. तबला ९३. डबर ९४. पैलथडी ९६. रंभा ९७. लाक्षा ९८. लीलया ९९. चालू १००. रडारड

**उभे शब्द** : १. सायाळ २. खळ ३. पुनर्वसू ४. डाग ६. नवरोज ७. योद्धा ८. शील ९. दणकट १०. निवडक ११. आजारी १३. दरा १५. क्षमा १६. चहा १८. गमन २०. जगावेगळा २१. सरवा २२. श्रावण २४. डरपोक २५. सावरी २६. मत्त २८. गरजू ३०. पगार ३२. हल्ला ३४. तमाशा ३५. नमन ३६. सावली ३७. भला ३८. तर्कट ३९. खडतर ४१. डोली ४२. थेर ४३. शिस्त ४४. खोटी ४५. मत ४६. बडा ४७. खापर ४८. गुरू ४९. गुजराण ५०. गजवदन ५१. धनदांडगा ५२. रेशीम ५३. ताट ५४. पेच ५५. बाल ५६. पोळ ५७. कथा ५८. विरागी ६०. चावा ६२. राकट ६३. वैनतेय ६४. श्रेणी ६६. पाडस ६७. सम्राट ६९. लोह ७०. जमीनजुमला ७१. बजरंगबली ७२. नळी ७३. सहाध्यायी ७४. तमा ७६. टोळधाड ७८. प्रिय ७९. तराजू ८०. चकली ८४. जहाल ८५. हातभार ८६. अंत ८७. दलाल ८९. कबर ९०. काडी ९१. करंडा ९४. पैलू ९५. थर

## पी. एन. पाटील गट राष्ट्रवादीत जाणार

■ कोल्हापूर

**कोल्हापूर- माजी** आमदार दिवंगत पी. एन. पाटील यांच्या कार्यकर्त्यांचा गट २५ ऑगस्टला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मंत्री सुनील तटकरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा प्रवेश होणार असल्याची माहिती पाटील यांचे सुपुत्र राहुल पाटील यांनी दिली. ते म्हणाले, वडील आयुष्यभर काँग्रेस पक्षाशी निष्ठावान राहिले. मात्र त्यांच्या अकाली निधनानंतर काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांकडून आमच्या गटाला अपेक्षित आधार दिला नाही. गेल्या विधानसभा निवडणुकीत करवीर मतदारसंघातून थोडक्यात पराभव झाला, तरीही आम्ही सातत्याने कार्यरत राहिलो.

## लोकशाही रक्षणासाठी काँग्रेसची आक्रमक भूमिका! सपकाळ यांचा कार्य अहवाल प्रसिद्ध

■ मुंबई

**महाराष्ट्र** प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा कार्य अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. त्यामध्ये सामाजिक न्याय, ओबीसी हक्क, आर्थिक स्वायत्तता आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी उचललेले महत्त्वाचे पावले अधोरेखित केली आहेत.

२७ जुलै रोजी बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव येथे धर्म व जात विचारून रोहित पैठणकर या युवकाच्या अमानुष मारहाणीच्या घटनेने राज्यभर संताप उसळला होता. या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अकोल्यातील रुग्णालयात जाऊन पीडिताची भेट घेतली आणि प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी त्यांनी या घटनेचा तीव्र निषेध करत सामाजिक सलोखा राखण्याचा संदेश दिलाहोता. ३० जुलै रोजी टिळक भवन येथे वडार आणि ओबीसी समाजाच्या प्रतिनिधींशी सपकाळ यांनी संवाद साधला. यावेळी ओबीसी जनगणना, सामाजिक न्याय व राजकीय हक्कांवर ठोस भूमिका मांडत काँग्रेसने ओबीसी समाजाच्या मागण्यांना पाठिंबा दर्शवला.१ ऑगस्ट रोजी राष्ट्रीयीकृत बँकांवर खाजगीकरणाचे संकट या विषयावर काँग्रेसने विशेष सभा आयोजित केली होती. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मोदी सरकारवर जोरदार टीका करत अदानी-अंबानी यांच्या कंपन्यांचे राष्ट्रीयकरण करण्याची मागणी केली होती. ७ व ८ ऑगस्ट रोजी काँग्रेसच्या नवनियुक्त जिल्हाध्यक्ष व तालुकाध्यक्षांसाठी दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते.

या शिबिरात विविध तज्ज्ञांच्या मार्गदर्शनात नेतृत्व विकास व संघटन बळकटीवर भर दिला.७ ऑगस्ट रोजी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि आमदार अमित देशमुख यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. या कार्यक्रमात परभणीतील माजी नगराध्यक्ष, नगरसेवक आणि अनेक कार्यकर्त्यांनीही काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ८ ऑगस्ट रोजी निवडणुकीतील मतचोरीच्या विरोधात काँग्रेसने दादरमध्ये जोरदार रास्तारोको आंदोलन केले. आंदोलनाच्या पूर्वसंध्येला सपकाळ यांनी पत्रकार परिषद घेऊन भाजपा आणि निवडणूक आयोगावर मतघोटाळ्याचे गंभीर आरोप केले होते.९ ऑगस्ट रोजी ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त काँग्रेसतर्फे टिळक पुतळ्यापासून क्रांती मैदानापर्यंत भव्य पदयात्रा काढली होती. या पदयात्रेत तुषार गांधी व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## ठाकरे ब्रँड पहिल्याच निवडणुकीत अपयशी

पान १ वरून- आल्या असून, कमी फरकाने गेलेल्या जागांसाठी फेरमोजणीची मागणी केली आहे. पक्षाचा पाठिंबा घेतला असता तर आम्ही सर्व जागा जिंकल्या असत्या. खरे तर आमची संघटना असो किंवा शशांक राव यांची संघटना असो, या भाजपाच्या झेंड्याखाली नाही, तर वैयक्तिकरित्या लढलो. ठाकरेंच्या संघटनेने आधी जो भ्रष्टाचार केला आहे, त्याची पोलखोल झाली पाहिजे. शशांक राव म्हणाले की, ठाकरे यांच्या शिवसेनेने बेस्टमध्ये कामगारविरोधी खासगीकरणाचे धोरण राबवले. त्या धोरणाविरोधात कामगारांनी नोंदवलेला हा विजय आहे. आज बेस्टची जी दशा झाली, त्यासाठी पूर्णपणे शिवसेना आणि त्यांची बेस्ट कामगार सेना ही युनियन जबाबदार आहे. नऊ वर्षांमध्ये जो काही भ्रष्टाचार झालेला आहे, त्याची चौकशी करणार आहोत. हे आमच्या वचननाम्यात आहे. हा सर्व पैसा कामगारांचा आहे. चौकशीत काही आढळले तर वसुलीदेखील केली जाईल.

## राजेश क्षीरसागरांनी खाजगी गाडीवर पोलीस बोर्ड लावल्याचा आरोप

■ कोल्हापूर

**आमदार** राजेश क्षीरसागर यांनी आपल्या खाजगी स्कार्पिओ गाडीवर पोलीस असे शासकीय स्टिकर लावून त्याचा गैरवापर केला. हे कायद्याचे उल्लंघन असून याबाबत कलम १७७ नुसार गुन्हा नोंदवून कारवाई करण्याची मागणी शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख रविकरण इंगवले यांनी पत्रकार परिषदेत केली.

डॉक्टर, बिल्डर यांना धमकावणे, मेडिकल बिलामध्ये लूट करणे असे विविध प्रकार क्षीरसागर यांनी यापूर्वी केल्याचेही आरोप इंगवले यांनी केले. आपल्या दहशतीमुळे ते आता कोल्हापूरचे आका झाले असल्याचे त्यांनी उपरोधिक वक्तव्य केले. ते म्हणाले, या प्रकरणी दोन-तीन दिवसांत पोलीस प्रशासनाकडून कारवाई न झाल्यास जिल्हा पोलीस प्रमुखांची शिष्टमंडळाद्वारे भेट घेऊन पुढील पावले उचलली जातील.

क्षीरसागर यांचा शासकीय कॅनव्हा आणि इतर शासकीय सुविधा रद्द करण्याची मागणीही त्यांनी केली.

## मुंबई व उपनगर हळूहळू पूर्वपदावर पाण्याचा निचरा नाही

पान १ वरून

आणि कुलाबा वेधशाळेत १०७.४ मिमी पावसाची नोंद झाली . वसई, विरार, नालासोपारात पाऊस थांबला होता . मात्र पाण्याचा निचरा न झाल्याने काही भाग पाण्याखाली आहे. दोन दिवसांच्या पावसामुळे घरांसोबतच तळमजल्यावरील दुकानांचेही पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे. वसई विरारमध्ये काही भागात १२ तास वीजपुरवठा खंडित झाला होता .

वसई पश्चिमेकडील आनंदनगर, समतानगर, साईनगर, शंभर फुटी रस्ता, सनसिटी, दिवाणमान, डीजी नगर, अंबाडी रोड या वस्त्या आजही जलयम आहेत. वसई पूर्वेकडील मिठागर पाण्याखाली गेले आहे . मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरही पाणी साचल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली आहे.

कल्याण तालुक्यात आज हलका पाऊस सुरूच होत्या . खडवली येथील भातसा नदीच्या पुलाला पाणी लागले. नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून खडवली येथील आंबेडकर नगर मधील घरांमध्ये भातसा नदीचे पाणी शिरले. कल्याणजवळ रायते नदीची पाणीपातळी वाढल्याने पात्रात अडकलेल्या कामगारांना पोकलेनच्या मदतीने बाहेर काढण्यात आले. काळू नदीच्या पुरामुळे शहाड परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी भरल्याने टिटवाळा रस्ता पाण्याखाली गेला. टिटवाळा जलमय झाले. कल्याण खाडीच्या पाणी पातळीत वाढ झाली.

कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर मुसळधार पावसामुळे उल्हास नदीवरील पूल पाण्याखाली गेला. त्यामुळे महामार्ग वाहतुकीसाठी तातडीने बंद करण्यात आला.

शहापूर तालुक्यातील भातसा धरण क्षेत्रात ४-५ दिवसांपासून संततधार सुरू आहे. गेल्या महिन्यात २३ जुलैला धरणाचे ५ दरवाजे उघडण्यात आले होते. त्यानंतर पावसाचे प्रमाण कमी झाल्यानंतर दरवाजे बंद करण्यात आले. आता मात्र भातसा धरणाचे ५ दरवाजे आज सकाळी अकराच्या सुमारास १.७५ मीटरने उघडण्यात आले.

## राजीव गांधींच्या जयंतीनिमित्त नेत्यांकडून श्रद्धांजली अर्पण

■ नवी दिल्ली

**माजी** पंतप्रधान राजीव गांधी यांना आज ८१ व्या जयंती निमित्त संसदेत श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इतर खासदारांनी सहभाग घेतला. तर काँग्रेस पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, खासदार प्रियंका गांधी त्यांचे पती रॉबर्ट वाड्रा आणि मुलगा रेहान यांनी दिल्लीतील वीरभूमी येथे जाऊन राजीव गांधी यांना पुष्पांजली अर्पण केली. पंतप्रधान मोदी यांनी एक्सवरून माजी पंतप्रधान राजीव गांधी यांना श्रद्धांजली अर्पण केली.

लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी त्यांच्या एक्सवर राजीव गांधींचा फोटो शेअर करत लिहिले की, माझे ध्येय माझ्या वडिलांचे स्वप्न पूर्ण करणे आहे. जिथे प्रत्येक नागरिकाला आदर मिळेल, त्यांच्या बद्दल सद्भावना असेल आणि देश लोकशाही व संविधानासह मजबूत उभा राहील. तर खासदार प्रियंका गांधी यांनी लिहिले की, आम्हाला तुमच्याकडून करुणा, प्रेम आणि देशभक्तीचा धर्म मिळाला आहे.आम्ही त्या धर्माचे नेहमी पालन करू.

## देशातील सुती धाग्यांच्या निर्यातीत ५० टक्के घट

■ मुंबई

**अमेरिकेने** भारतीय वस्तूंवर अतिरिक्त आयातशुल्क लावल्यामुळे देशातील सुती धाग्यांच्या निर्यातीत ५० टक्के घट झाली आहे. भारतीय कापसाच्या दरापेक्षा आंतरराष्ट्रीय बाजारातील कापसाची किंमत कमी असल्यामुळे कापसाची आयात वाढली आहे. याचा फटका देशातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता आहे.

कापूस उद्योजक संघटना कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष अतुल गणात्रा यांनी सांगितले की, देशातील कापसाच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारातील किमतींपेक्षा दहा ते बारा टक्के अधिक आहेत. त्यामुळे या वर्षी ३९ लाख गासड्यांची आयात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारतातील कापसाच्या किमती उतरल्या असून त्याचा फटका शेतकऱ्यांनाही बसणार आहे. देशात सुती वस्त्रांचा सर्वाधिक व्यापार होत असलेल्या तामिळनाडूच्या तिरप्पूर येथीलही अनेक व्यवसाय ठप्प झाले आहेत. देशातून सुती वस्त्रांची ३५ अब्ज डॉलरची निर्यात होत असते त्यातील १२ अब्ज डॉलरची निर्यात अमेरिकेत होते.

**लोणावळा नगरपरिषद, लोणावळा**
**जाहीर नोटीस २०२५**

लोणावळा नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागामध्ये कामकाज करणेकामी अनुभवी व ईच्छुक सेवानिवृत्त कर्मचारी यांचेकडून करार पध्दतीने कामकाजासाठी नामिकासूची (Empanelment) पध्दतीने अर्ज मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | तपशील | संख्या | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | लोणावळा नगरपरिषद हद्दीतील कार्यरत व अस्तित्वातील पाणी पुरवठा वितरण व्यवस्था सुरळीत करणे करीता व अस्तित्वातील पाणी पुरवठा वितरणातील त्रुटी दुर करून नागरीकांना नियमित पाणीपुरवठा होईल यासाठी पर्यवेक्षीय कामकाजाकरीता अनुभवी शासकिय निमशासकीय अधिकाऱ्यांना मानधन तत्वावर घेणेसाठी निविदा मागविणेबाबत. | १ | १ वर्ष |

टीप - १. विहित नमुन्यातील अर्ज लोणावळा नगरपरिषद कार्यालय येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत जाहीर नोटीस दिनांकापासुन स्विकारण्यात येतील. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २८ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत असेल.
२. विहित नमुन्यातील अर्ज लोणावळा नगरपरिषद कार्यालय येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत मिळेल तसेच इतर अटी व शर्ती पाहण्यास मिळेल.

सही/-
**(अशोक साबळे)**
मुख्याधिकारी
लोणावळा नगरपरिषद, लोणावळा

जा.क्र. लोनप/जाहिर नोटीस/२२०२
लोणावळा नगरपरिषद लोणावळा
दिनांक :-२०/८/२०२५

**SEALED TENDERS INVITED FOR THE REPAIR AND PAINTING WORK OF**

**POISAR HIMGIRI CO. OP. HSG. SOC. LTD,** BUILDING NO.31, SAMATA NAGAR, KANDIVALI(EAST), MUMBAI- 40101. Tender forms available Consultant's office at Gala No 425, Gundecha Industrial Complex, Prem. Co. Op. Soc. Ltd. , Near Growel's Mall , Akurli Road , Kandivali (East ), Mumbai -400101 from Date: 21/08/2025 to 30/08/2025 between 12 PM to 5 PM (Except Sunday) Last Date of submission sealed tender 08/09/2025 between 12 pm to 5 pm Tender to be submitted at society's office cost of tender RS 4000/- in cash (Nonrefundable) **Standard Civil Engineers PVT LTD Mob: 9819037336 / 022-44503050**

**SEALED TENDERS ARE INVITED FOR THE BUILDING REPAIR, PODIUM & SWIMMING POOL WATERPROOFING, UNDERGROUND WATER TANK WATERPROOFING, CANOPY, ENTRANCE GATE RENOVATION, FLOORING BEAUTIFICATION, PLUMBING, PAINTING AND OTHER ALLIED WORK OF**

**SUDARSHAN SKY GARDEN CO. OP. HSG. SOC. LTD,**

NEAR BHAKTI PARK, GHODBUNDER ROAD, ANAND NAGAR, THANE(W), PIN NO-400615.

Tender forms available Consultant's office at Gala No 425, Gundecha Industrial Complex, Prem. Co. Op. Soc. Ltd., Near Growel's Mall, Akurli Road, Kandivali (East), Mumbai -400101

from Date: **20/08/2025 to 28/08/2025** between 12 PM to 5 PM (Except Sunday)

Last Date of submission sealed tender **31 /08/2025** between 12 pm to 5 pm

Tender to be submitted at society's office cost of tender RS 5,000/- in cash (Non refundable)

**Standard Civil Engineers PVT LTD**

Mob: 9819037336 / 022-44503050

## खराब रस्त्यावरील टोलवसुली सर्वोच्च न्यायालयाने स्थगित केली

पान १ वरून

१२ तास लागत असतील, तर त्याला १५० रुपये का द्यावे लागतात? तासाभरात नियत स्थळी पोचणे शक्य आहे, तिथे आणखी ११ तास लागत आहेत आणि टोलही द्यावा लागत आहे, असे न्यायमूर्ती म्हणाले. केरळ हायकोर्टाने ६ ऑगस्ट रोजीच्या आपल्या निर्णयात चार आठवड्यासाठी टोल वसुलीला स्थगिती दिली होती. सर्वोच्च न्यायालयानेही हाच निर्णय कायम ठेवला. न्यायालयाने सांगितले, की रस्ते देखभाल दुरुस्ती न केल्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे. परिणामी जनजीवन विस्कळीत होत असेल तर टोल वसुली केली जाऊ शकत नाही.

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**ई-निविदा सुचना क्र. २१ (सन २०२५-२६)**

नाशिक महानगरपालिका, नाशिक सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक पश्चिम प्र.क्र.०७ मधील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मृती उदयानात, एक्सपिरीयंस म्युझीयम तयार करणे या कामाकरीता प्राकलन तयार करणेसाठी दर पत्रक (कोटेशन दर) मागविणे, या कामांची ई - निविदा सुचना क्रमांक. २१ (सन २०२५-२६) दिनांक २०/०८/२०२५ पासुन दिनांक २५/०८/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपावेतो मा.शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिसेल. निविदा स्विकृतीची अंतिम दिनांक २५/०८/२०२५ राहील.

**टीप** - यापुढील सर्व आवश्यक सुचना / शुध्दीपत्रक हे Online website वर प्रसिध्द करणेत येतील.

जनसंपर्क/जा.क्र/२२३/२०२५ दि.१९/०८/२०२५


गोदा प्रदुषण टाळा, भविष्य संभाळा.

**Sd xxx**
**शहर अभियंता**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

नवाकाळ

• पुणे । गुरुवार २१ ऑगस्ट, २०२५ • पान -८


# मदतीशिवाय कागदही उचलू शकत नाही! अमिताभ बच्चन यांची व्यथा



**मुंबई -** मी आता कोणाच्या मदतीशिवाय जमिनीवर पडलेला कागदाचा कपटाही उचलू शकत नाही. अशी आपली व्यथा सुपरस्टार अमिताभ बच्चन यांनी व्यक्त केली आहे.

आपल्या ब्लॉगमध्ये अमिताभ बच्चन यांनी म्हातारपणाच्या व्यथा मांडल्या आहेत. त्यांनी म्हटले की, वाढत्या वयाचा त्यांच्या हालचालींवर परिणाम होत आहे. आता त्यांना नेहमी आधार घ्यावा लागत आहे. अगदी लहान लहान गोष्टी करतांनाही कोणाची तरी मदत घ्यावी लागते. डॉक्टरांनी त्यांना वावरताना पायघोळ विजार घालण्याचा सल्ला दिला आहे. कारण उभे राहिल्यास तोल जाण्याचा धोका आहे. वयाच्या ८२ वर्षी अमिताभ बच्चन यांनी पहिल्यांदाच आपल्या ब्लॉगमधून वृद्धत्वाविषयीच्या भावना व्यक्त केल्या आहेत. अमिताभ बच्चन यांच्या कौन बनेगा करोडपतीचा नवा मोसम सुरू होत असून आजही ते अनेक जाहिरातींमधून दिसत असले तरी आपल्याला आता विशेष काळजी घ्यावी लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## सिडको जमीन घोटाळा प्रकरण
# नवी मुंबईत शिरसाटांविरोधात मोर्चा

■ नवी मुंबई

**नवी** मुंबई विमानतळाजवळच्या १५ एकर शासकीय जमिनीच्या गैरव्यवहाराचा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यावर आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने आज बेलापूर सिडको मुख्यालयावर मोर्चा काढला. यावेळी आंदोलकांनी मंत्री शिरसाट यांच्या विरोधात घोषणा देत राजीनाम्याची मागणी केली. या आंदोलनात आ. रोहित पवार, आ. शशिकांत शिंदे यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

या जमिनीची सध्या बाजारभावाप्रमाणे किंमत ४ हजार कोटी रुपये आहे. परंतु संजय शिरसाट यांनी सिडको अध्यक्ष असताना नियमबाह्य पद्धतीने बिवलकर कुटुंबियांना फायदा करून दिला. बिवलकर कुटुंबाला ब्रिटिश काळात इनामस्वरूप दिलेली जमीन नंतर सरकारी मालकीची झाली होती. मात्र अलीकडेच त्यापैकी १५ एकर जमीन पुन्हा त्यांच्या नावावर झाल्याची माहिती आहे.

## ढगफुटीमुळे किन्नौर कैलास यात्रा रद्द

**शिमला-** ढगफुटीमुळे उद्भवलेल्या अचानक पुरामुळे हिमाचल प्रदेशातील कुल्लू जिल्ह्यातील कानोन गावातील एक पूल आणि तीन दुकाने वाहून गेली. काही भागांत सततच्या पावसामुळे झालेल्या भूस्खलनामुळे, जिल्हा प्रशासनाने कुल्लू आणि बंजार उपविभागांतील सर्व शैक्षणिक संस्था आणि अंगणवाडी केंद्र मंगळवारी बंद ठेवण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# पुण्यातील धरणातून विसर्ग सुरू
## नागरी वस्त्यांमध्ये पाणी शिरले

■ पुणे

राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाचा जोर पुणे, रायगड आणि पश्चिम महाराष्ट्रात आजही ओसरला नाही.

घाटमाथा परिसरात आजही मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे पुण्याला पाणीपुरवठा करणारी चारही धरणे भरली आहेत. या धरणांतून पाण्याचा वाहतूक कोंडी झाली. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. पुण्याहून शिवाजी महाराज टर्मिनसला जाणाऱ्या रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

पुण्याला पाणीपुरवठा करणारी चारही धरणे १०० टक्के भरली. मुठा नदीतून ३५ हजार क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. खडकवासला धरणातूनही मोठ्या प्रमाणात विसर्ग करण्यात येत असून तो विभाग प्रमुख ओमप्रकाश बहिवाल यांनी दिली.

हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, आज सकाळपर्यंत गेल्या २४ तासांत पुण्यात ताम्हिणी येथे सर्वाधिक तब्बल ५७५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. लोणावळा येथे ४१८, मुळशी येथे १६२ मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला. यंदाच्या मोसमात ताम्हिणी येथील पाऊस आतापर्यंत



विसर्ग वाढवल्याने पुणे शहरातील नदीकाठच्या काही वस्त्यांमध्ये पाणी शिरले आहे. दरम्यान, १५ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट या पाच दिवसांत संपूर्ण महाराष्ट्रात झालेल्या पावसामुळे आतापर्यंत २१ लोकांचा मृत्यू झाला आहे.

पुण्यात डेक्कन परिसर, खिलारे वस्ती, एकता नगरमध्ये घरात पाणी शिरले. महापालिकेने खबरदारीचा उपाय म्हणून सकाळपासूनच रहिवाशांना घरातून बाहेर सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भिडे पुल आजही वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला. पावसांमुळे ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात आणखी वाढवण्यात येणार आहे.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आळंदीतील इंद्रायणी नदीला पूर आला आहे. मंदिराकडे जाणारा भक्ती-सोपान पूल आणि दर्शन बारीचा पूल पाण्याखाली गेले आहेत. पाण्याचा प्रवाह वाढतच चालला असून इंद्रायणी नदी पात्र सोडून वाहू लागली आहे. सावधगिरीचा उपाय म्हणून जुना पूल आणि इंद्रायणीच्या घाटावर भाविकांना बंदी घालण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड परिसरात पावसाचा जोर ओसरला असला तरी पवना आणि मुळा नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ होणार, अशी माहिती पिंपरी चिंचवड महापालिका आपत्ती व्यवस्थापन ७,४२८ मिलिमीटरवर गेला आहे. गेल्या वर्षी ताम्हिणी येथे सुमारे ९,५०० मिलिमीटर पावसाची नोंद झाली होती.

मुळशी धरण परिसरात पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. मुळशी तालुक्यात मंगळवारी तब्बल ३७९ मिलिमीटर पावसाची नोंद झाल्यामुळे पूरस्थिती उद्भवली आहे. अनेक घरांमध्ये पाणी शिरले आहे. शेरे गावात पाणी शिरल्याने घरातील अनेक वस्तुंचे नुकसान झाले. प्रशासनाकडून नागरिकांना घराबाहेर काढण्यात आले.

हवामान विभागाने मुंबई शहर आणि उपनगरांना बुधवारसाठी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला होता. पण चाकरमानी घराबाहेर पडत असतानाच त्यामध्ये बदल करून हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला. यासोबतच पालघर, ठाणे, पुणे आणि रायगड जिल्ह्यांनाही रेड अलर्ट देण्यात आला.

१५ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट या पाच दिवसांत संपूर्ण महाराष्ट्रात झालेल्या पावसामुळे आतापर्यंत २१ लोकांचा मृत्यू झाला असून, १० लोक जखमी झाले आहेत. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील सर्वाधिक ७ जणांचा समावेश आहे. तर मुंबई शहर आणि उपनगरात तीन जण दगावले.

पुरात वाहून जाणे, घर कोसळणे यासारख्या पावसाशी संबंधित घटनांमध्ये याच काळात ११ जनावरांचा मृत्यू झाल्याचे प्रशासनाने सांगितले. मुंबई शहर आणि उपनगरात सहा जनावरे दगावली, तर बुलडाण्यात तीन जनावरांच्या मृत्यू सरकार दप्तरी नोंद आहे.

**राज्यातला पाणीसाठा १२ टक्क्यांनी वाढला**

गेल्या ५ दिवसांत राज्यातील धरणांचा पाणीसाठा जवळपास १२ टक्क्यांनी वाढला. हा साठा ६९ टक्क्यांवरून थेट ८१ टक्क्यांवर पोहोचला. कोकण विभागात सर्वाधिक ९१ टक्के पाणीसाठा आहे. त्याखालोखाल पुणे विभागात ८९टक्के, अमरावतीत ७९टक्के, संभाजीनगरमध्ये ७३ टक्के, नाशिकमध्ये ७१ टक्के आणि नागपूर विभागात ६९ टक्के जलसाठा उपलब्ध आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही तलावात मिळून ९५ टक्के पाणीसाठा आहे. तुलसी, विहार, मोडकसागर आणि तानसा १०० टक्के भरले. भातसा ९३ टक्के, मध्य वैतरणा ९९ टक्के, अप्पर वैतरणा ९२ टक्के जलसाठा आहे. पूरस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी धरणक्षेत्रातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

# जगबुडी नदी पुन्हा धोक्याच्या पातळीवर

■ रत्नागिरी

**रत्नागिरी** जिल्ह्यातील खेड शहरात जगबुडी नदी पुन्हा एकदा धोक्याच्या पातळीवर पोहोचली आहे. जगबुडी नदी मटण मार्केट येथे सातवी रेषेच्यावर १० फूट इतके पाणी वाढले आहे. त्यामुळे खेड शहर पुराच्या उंबरठ्यावर आहे. खबरदारीचा उपाय म्हणून नगर परिषद प्रशासनाने व्यापारी आणि नागरिकांना सावधगिरीचा इशारा दिला आहे.

सध्या वशिष्ठी नदीची पाणी पातळी ४.९० मीटर म्हणजेच इशारा पातळीच्या खाली गेली आहे. ती स्थिर आहे. तर कोळकेवाडी धरणाची पाणी पातळी १३३.०५ मीटर आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटातील भोगाव गावच्या हद्दीत २००५ पासून सातत्याने रस्ता खचत असल्याने डेंजर झोन म्हणून ओळखला जाणारा रस्ता आणखी खचला. येथे आज दरडही कोसळली.

कोल्हापूरच्या शाहूवाडी तालुक्यातील कानसाखोऱ्यात अतिवृष्टीमुळे वारणा नदी व कानसा नदी यांचा संगम असलेल्या मालेवाडी गावाशेजारी विरळे जाणाऱ्या रस्त्यावर चार ते पाच फूट उंचीचे पाणी आल्यामुळे १६ गावांचा संपर्क तुटला. शाळा, बाजारपेठा पूर्णपणे बंद ठेवण्यात आल्या. वारणा नदीमधून ३५ हजार क्युसेक्स पाणी नदीपात्रात सोडण्यात आले.

राधानगरी धरणाचे ५ दरवाजे बंद करण्यात आले असून अद्याप २ स्वयंचलित दरवाजे उघडलेले आहेत. राधानगरी धरणातून एकूण ४३५६ क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू आहे. राजाराम बंधारा इथे पंचगंगा नदीची पाणी पातळी ३९.०९ फुटांवर पोहोचली आहे.

## पुणे-मुंबई रेल्वेगाड्या रद्द
# कोकण रेल्वेलाही फटका

■ मुंबई

**सोमवारपासून** कोसळत असलेल्या पावसाचा जोर मंगळवारी आणखी वाढला. त्यामुळे काही ठिकाणी रेल्वे फलाटावर साचलेल्या पाण्याचा नीट निचरा न झाल्याने बुधवारी पुणे-मुंबई मार्गावरील अनेक महत्त्वाच्या रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या.

सकाळी धावणाऱ्या सिंहगड एक्सप्रेस, डेक्कन एक्सप्रेस आणि प्रगती एक्सप्रेस या तिन्ही रेल्वे रद्द करण्यात आल्या. दुपारच्या सत्रातील डेक्कन आणि इंटरसिटीही रद्द करण्यात आली. तसेच पुणे मार्गे मुंबईहून सोलापूरला जाणारी वंदे भारत एक्सप्रेसही आज धावली नाही. काल मुंबईहून पुण्याच्या दिशेने धावणाऱ्या रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या होत्या. मुंबईतील मुसळधार पावसामुळे या रेल्वे रद्द करण्यात आल्या असल्याची माहिती देण्यात आली. पुण्यासोबतच कोकण रेल्वेलाही मुंबईतल्या पावसाचा फटका बसला. कोकणात येणाऱ्या अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या. मुंबई मडगाव अप डाऊन जनशताब्दी एक्सप्रेस, मुंबई ते मडगांव वंदे भारत एक्सप्रेस अप डाऊन या गाड्या आज रद्द करण्यात आल्या.

## विदर्भात बुलडाणा, गडचिरोलीतील
# अनेक गावांचा संपर्क तुटला

■ नागपूर

**विदर्भात** गेल्या तीन दिवसांपासून पावसाचा जोर कायम राहिल्याने अनेक जिल्ह्यांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. गडचिरोली, बुलडाणा, चंद्रपूर, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्याला सर्वाधिक फटका बसला. गडचिरोलीच्या भामरागड तालुक्याला जोडणारा पर्लकोटा नदीवरचा पूल पाण्याखाली गेल्याने जवळपास १०० गावांचा संपर्क तुटला. त्यामुळे दोन्ही बाजूंची वाहतूक ठप्प झाली. भामरागड तालुक्याचा जिल्हा मुख्यालयासोबतचा संपर्क तुटला आहे.

पर्लकोटा, पामूलगौतम, इंद्रावती या तिन्ही नद्यांना पूर आला आहे. जिल्ह्यातील देसाईगंज, कोरची, अहेरी, कुरखेडा, एटापल्ली या तालुक्यांनाही पुराचा फटका बसला. बुलढाणातील चिखली तालुक्याला अतिवृष्टीचा मोठा फटका बसला. १५० गावांतील १ लाखहून अधिक शेतकऱ्यांचे नुकसान झाले. दुसरीकडे, धरणांची पाणीपातळी वाढल्याने वर्धा जिल्ह्यातील धामचे धरणाचे २१ आणि निम्न वर्धाचे १९ दरवाजे उघडण्यात आले आहेत.

# कसारा घाटात जव्हार फाट्याजवळ दरड कोसळली

■ मुंबई

**मुंबई - नाशिक** महामार्गावरील जुन्या कसारा घाटात जव्हार फाट्याजवळ आज सकाळी दरड कोसळली. घाटमाथ्यावर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे ही घटना घडली. अचानक झालेल्या या घटनेमुळे काही काळ वाहन चालकांची मोठी गैरसोय झाली.

या घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, कर्मचारी तत्काळ घटनास्थळी पोहोचले. विशेष यंत्रणा उपलब्ध नसतानाही पोलिसांनी स्वतः हाताने दगड आणि माती बाजूला करत रस्ता मोकळा केला आणि वाहतूक सुरळीत केली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झाली नाही. पण मुसळधार पावसाचा जोर कायम असल्याने घाट परिसरात दरड कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# राज्यात वराह जयंती साजरी करा! नितेश राणेंची मागणी

■ मुंबई

**हिंदू** धर्मातील दशावतारांपैकी तिसरा अवतार मानल्या जाणाऱ्या वराह भगवानाच्या जयंतीनिमित्त राज्यभर उत्सवाचे वातावरण निर्माण करण्यासाठी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी पुढाकार घेतला आहे. यासाठी त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून २५ ऑगस्ट हा दिवस वराह जयंती उत्सव दिन म्हणून घोषित करण्याची मागणी केली आहे.

नितेश राणे यांनी पत्रात नमूद केले की, २५ ऑगस्ट रोजी येणारी भाद्रपद शुद्ध द्वितीया ही वराह जयंती म्हणून साजरी केली जाते. वराह भगवानाच्या पूजनामुळे वसुंधरा, समाजात धर्म, सदाचार आणि पर्यावरण रक्षणाची जाणीव जागृत होते.या दिवसाला धार्मिक तसेच सांस्कृतिकदृष्ट्या मोठे महत्त्व आहे. त्यामुळे शासनाने याबाबत अधिसूचना काढून जिल्हा पातळीवर व प्रमुख शहरांमध्ये विशेष सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करावे. शाळा व महाविद्यालयांमध्ये वराह भगवानाच्या इतिहास, संदेश व पर्यावरण रक्षणाशी निगडित शिकवणींवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात यावे.

# चोक्सीच्या सुनावणीला पुन्हा विलंब

■ मुंबई

पंजाब नॅशनल बँकेत कोट्यावधी रुपयांचा घोटाळा करून परदेशात पळून गेलेला आरोपी मेहूल चोक्सी याला फरार घोषित करण्याच्या निर्णयाला विलंब होणार आहे. कारण या प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या न्यायाधीशांची बदली करण्यात आली आहे. नव्या न्यायाधीशांची नेमणूक झाली असून आता सप्टेंबर महिन्यापासून या प्रकरणीची सुनावणी होण्याची शक्यता आहे.

पंजाब नॅशनल बँकेत कोट्यावधीचा घोटाळा करून चोक्सी २ जानेवारी २०१८ रोजी भारतातून पळून बेल्जियमला गेला होता. आपण घोटाळ्यामुळे नव्हे तर वैद्यकीय उपचारासाठी बेल्जियमला आल्याचे त्याने म्हटले होते. गेल्या साडेसात वर्षांपासून तो तिथे असून त्याच्या विरोधात सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीने कारवाई सुरु केली आहे. चोक्सीला बेल्जियममध्ये अटक करण्यात आली असून भारतीय दूतावास त्याच्या प्रत्यार्पणाची तयारी करत आहे. ईडीने चोक्सीविरोधात जुलै २०१८ मध्ये याचिका दाखल केली होती. तेव्हापासून या प्रकरणाची सुनावणी सुरु होती.

# दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्तांवर अज्ञाताकडून हल्ला! कानशिलात मारली

■ नवी दिल्ली

**दिल्लीच्या** मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यावर आज सकाळी सिव्हिल लाईन्स येथील कॅम्प ऑफिसमध्ये आयोजित जनता दरबारमध्ये एका विकृत इसमाने हल्ला केला.त्याने रेखा गुप्ता यांच्या कानशिलात मारली आणि त्यांचे केस पकडून त्यांना खेचून जमिनीवर पाडले. तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी काही क्षणांतच या इसमाला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. राजेश खिमजी साकरिया असे त्याचे नाव आहे. पोलिसांनी त्याची चौकशी करून त्याच्यावर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

सकाळी सुमारे ८.३० वाजता जनता दरबार सुरू होता. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्याकडे आरोपी राजेश याने निवेदन दिले. मुख्यमंत्री त्याने दिलेले निवेदन वाचत असता त्याने मुख्यमंत्र्यांना शिवीगाळ करत त्यांच्यावर हल्ला चढवला. अचानक घडलेल्या या घटनेमुळे एकच गोंधळ उडाला. घटनास्थळी उपस्थित पोलीस आणि सुरक्षा रक्षकांनी तातडीने परिस्थिवर नियंत्रण मिळवले.



गुप्ता यांना तत्काळ घटनास्थळापासून दूर नेण्यात आले. नंतर गुप्ता यांची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी डॉक्टरांना बोलावण्यात आले. या घटनेचा निषेध करत दिल्ली भाजप अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा आणि दिल्ली काँग्रेस अध्यक्ष देवेंद्र यादव यांनी मुख्यमंत्री सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

## जळगावच्या एरंडोलमध्ये शॉक लागून
# कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू

■ जळगाव

**जळगावच्या** एरंडोल तालुक्यातील वारखेडी शिवारात आज पहाटे एका कुटुंबातील पाच जणांचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. शेताभोवती लावलेल्या वीजवाहक तारेला स्पर्श झाल्याने ही दुर्घटना घडली.

वारखेडी गावातील शेतकऱ्याने आपल्या पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेताभोवती लोखंडी तारांचे कुंपण घालून त्यात वीज प्रवाहित केली होती. मात्र, याची कल्पना नसलेल्या मजुरांचा त्याच्याशी संपर्क आल्याने त्यांना विजेचा जोरदार झटका बसला. यात आई, मुलगा, सून आणि दोन लहान मुलांचा जागेवरच मृत्यू झाला. या घटनेमुळे गावात खळबळ उडाली.

# एनसीईआरटी विद्यार्थ्यांसाठी ऑपरेशन सिंदूरचा अभ्यासक्रम

■ नवी दिल्ली

**विद्यार्थ्यांना** ऑपरेशन सिंदूरविषयी सविस्तर माहिती मिळावी यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी)ने दोन विशेष अभ्यासक्रम प्रसिद्ध केले आहेत.

ऑपरेशन सिंदूर शौर्याची गाथा हा अभ्यासक्रम प्राथमिक व माध्यमिक स्तरासाठी तर ऑपरेशन सिंदूर सन्मान आणि शौर्याचे मिशन हा अभ्यासक्रम माध्यमिक स्तरासाठी तयार करण्यात आला असून हे दोन्ही अभ्यासक्रम ऑनलाइन उपलब्ध आहेत. कनिष्ठ विद्यार्थ्यांसाठीच्या अभ्यासक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १३ मे रोजी आदमपूर येथे सैनिकांच्या घेतलेल्या भेटीचा फोटो समाविष्ट आहे. या छायाचित्रावर ऑपरेशन सिंदूर ही केवळ साधी लष्करी कारवाई नाही तर भारताच्या धोरण, इच्छाशक्ती आणि निर्णायक क्षमतेचा संगम आहे, हे पंतप्रधानांचे वक्तव्यही आहे. या अभ्यासक्रमात ७ मे रोजी पहाटे सुरू झालेल्या ऑपरेशनची माहिती छायाचित्रे व चार्टसह दिली आहेत.

वरिष्ठ विद्यार्थ्यांसाठीच्या अभ्यासक्रमात पाकिस्तानचे भारतात शांतता भंग करण्याचे प्रयत्न, १९४७, १९६५, १९७१ आणि १९९९ मधील युद्धांचा तसेच २०१६ मधील उरी हल्ला आणि २०१९ मधील पुलवामा हल्ल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.

## बीडमध्ये सरकारी वकिलाने
# न्यायालयात आयुष्य संपवले

**बीड -** बीड जिल्ह्यातील वडवणी येथील न्यायालयात कार्यरत असलेले सरकारी वकील विनायक चंडेल यांनी न्यायालयाच्या खिडकीला गळफास घेऊन आत्महत्या केली. आज सकाळी ११ वाजता ही घटना घडली.

दिवाणी व फौजदारी न्यायालय, वडवणी येथे वकिलांच्या चेंबरमधील खिडकीच्या गजाला चंडेल यांनी गळफास लावला होता. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचत मृतदेह ताब्यात घेतला. विनायक चंडेल यांची जानेवारी २०२५ मध्ये सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती झाली होती.